# *देव स्वतःची ओळख त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे देतो*

मी, तेथे माझा मित्र जोसेफ बोस, यांना पाहून जरा अचंबित झालो आणि मी सभोवती वळलो आणि त्याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी थोडा वेळ घेतला.

2 आता आपण देवाच्या वचनाकडे वळूया. इब्री लोकांस पत्र, 1 ला अध्याय मी त्यांतील काही भाग 1 ले, 2 रे, आणि तिसरे वचन वाचू इच्छितो; ह्यासाठी की, ह्या रात्री तुमचे लक्ष ह्या विषयाकडे वेधावे.

*देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी आपल्या पूर्वजांशी संदेष्ट्यांच्या द्वारे बोलला.*

*तो ह्या काळाच्या शेवटी आपल्याशी पुत्राच्याद्वारे बोलला आहे; त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारिस करुन ठेविले आणि त्याच्याद्वारे त्याने विश्व निर्माण केले.*

*हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्वाचे प्रतिरुप आहे; आणि आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे. जेव्हा त्याने…तो उर्ध्वलोकी राजाधिराज जो ईश्वर त्याच्या उजवीकडे बसला.*

3 आता आपण आपली मस्तके प्रार्थनेसाठी झुकवुया. आणि आता त्याच्या दिव्य उपस्थितीत, जर तुमची एखादी विनंती असेल जी तुम्हांला त्याला सांगण्यास आवडेल, तुम्ही तुमचे हात वर करा, आणि जी तुमची विनंती आहे, ती परमेश्वर मान्य करील…

4 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही आता तुझ्या सिंहासनासमोर तुझा पुत्र, येशू ख्रिस्ताच्या नावावरील विश्वासाद्वारे येत आहोत. आणि आम्हाला ही खात्री देण्यात आली आहे की, "जर आम्ही त्याच्या नावाने काही मागू तर ते दिले जाईल." आणि तुला आमच्या इच्छा आणि आमच्या गरजा माहीत आहेत, आणि तू अभिवचन दिले आहेस की, तू आमच्या सर्व गरजा भागवशील. म्हणून पित्या, तू आम्हास शिकवल्याप्रमाणे आम्ही प्रार्थना करतो, "तुझे राज्य येवो, तुझी इच्छा पृथ्वीवर पूर्ण होवो, जशी ती स्वर्गात पूर्ण आहे." आज रात्री आमची विनंती तुझ्या इच्छेप्रामाणे असू दे आणि आम्हास ते सौभाग्य देण्यासाठी प्रदान कर. प्रभू वचनाला आणि सर्व वक्त्यांना आणि ऐकणार्यांस अभिषेक कर, आणि ह्या रात्री पवित्र आत्मा येऊ दे आणि आम्हामध्ये वचन कार्य करु दे. कारण आम्ही त्याच्या नावाने मागतो. आमेन.

तुम्ही बसू शकता.

5 मला समजले आहे की, उद्या सकाळी फूल गॉस्पल बिजनेस मेनची न्याहरी आहे. सहसा, जेथे त्यांची सभा असते, त्यांच्या न्याहरीच्या वेळी मला बोलण्याचे सौभाग्य लाभते. ह्या समयात, ती एकमेव संघटना आहे, जी एक संघटना नाही. परंतु, फक्त एक समुह आहे जिचा मी—मी घटक आहे, ती ख्रिश्चन बिजनेसमॅन आहेत. आणि आता मी त्यांच्यासाठी, आंतरराष्ट्रीय पातळीवर बोलतो.

6 आता, ह्या रात्री, आपण विश्वास करतो की, हे जमणे व्यर्थ जाणार नाही. मी तुमच्याकडे जणू थकलेलो, थकलेला घसा आणि थोडा श्वास नलिकेसंबंधी त्रास त्यापासून झाला…

7 मी टूसान येथून आलो. जेथे, खरोखरीच ते चांगले व कोरडे वातावरण होते, आणि मी येथे आलो आणि येथले वातावरण चांगले आणि आर्द्र आहे. म्हणून तेथे अगदी विरुध्द आहे. जर तुम्हा सर्वांकडे येथे पाणी असेल, तर तुम्ही आमच्या मार्गात पाठवा, आम्हाला ते आवडेल. परंतु तुम्ही अर्थात ते करु शकत नाही.

8 परंतु मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. तेथे एक दाखला आहे. ॲरिझोनात आपल्या—आपल्या—आपल्या सर्व गोष्टी, आपली झाडे, काट्यांनी भरलेली आहेत. सर्वत्र काटे आहेत. हे अशासाठी की तेथे कोरडे हवामान आहे. आता जर तेच झुडूप, येथे वाढवले, तर त्याला चांगली पाने येतात. पाहा, ते पाण्याशिवाय आहे. ह्याच कारणामुळे ते काटेरी बनते.

9 आणि जेव्हा चर्च, जीवनाच्या पाण्याशिवाय बनते, ते कोरडे आणि काटकी, बनते. सर्व गोष्टीत तेथे काटे बोचतात आणि लागतात. परंतु जेथे जीवनाचे पाणी वाहते, ते पानांना उघडते आणि त्यांना मऊ, परिपक्व, गोड, पवित्र आणि देवाला ग्रहणीय करते. म्हणून प्रभू परमेश्वर आम्हांस ह्या रात्री पाणी शिंपडो; ह्यासाठी की आम्ही काटेरी बनू नये; तर चांगली पाने बनावी अशासाठी की, रस्त्याकडचे लोक आपल्या सावलीत झाडाखाली बसावी आणि त्यांच्या जीवास विसावा मिळावा.

10 आता ह्या रात्री, जर प्रभूची इच्छा असेल, तर मी हे वचन घेऊ इच्छितो, आणि मी हा लहानसा माईक जितके होईल तितका जवळ खेचत आहे, कारण आवाज निघत नाही. मी येथे इब्री लोकांस पत्रातला 1:1 वाचत आहे. मी हा विषय घेऊ इच्छितो: *देव स्वतःची ओळख त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे देतो*. मी ते पुन्हा सांगू का, कारण येथे ध्वनी लहरींचा आवाज चांगला नाहीए. देव स्वतःची ओळख त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे देतो.

11 आता, बहुतेक कुठलीही गोष्ट त्यांच्या स्वभाव-गुण वैशिष्ट्याद्वारे ओळखल्या जातात. आणि माझ्याकडे येथे काही वचने आहेत, जी मी...आणि टिप्पणी करा की, मला त्यांचा संदर्भ देण्यास आवडेल. आता कुठल्याही गोष्टीच्या गुणवैशिष्ट्यानुसार ते काय आहे, हे ओळखले जाते.

12 आता, जसे सर्व सृष्टीत फुले बहुतेक वेळा, त्यांच्या गुणवैशिष्ट्यानुसार ओळखली जातात. जर ते एका जातीच्या जवळपास आहेत, तर त्या फुलाच्या गुणवैशिष्ट्यानुसार दुसरे फुल काय आहे, ते ओळखता येईल. आणि जंगली जीवनात, कित्येक वेळा...

13 मी, मी एक शिकारी आहे. आणि तुम्ही ज्या प्राण्याची शिकार करता, तुम्हाला त्याची गुणवैशिष्ट्ये माहित असली पाहिजे, किंवा कधी तुम्ही निश्चितच फसविले जाऊ शकता. उदाहरणार्थ, वर ब्रिटीश कोलंबिया येथील स्टोन शीप. मी ह्या मागील पाने गळण्याच्या हंगामात युकन स्थानी होतो. काही बंधुजन येथे माझ्याबरोबर होते आणि आम्ही शिकार करीत होतो.

14 आता, जर तुम्हाला फरक माहीत नाही, जेव्हा तुम्ही मेंढी किंवा हरिणाचा त्यांच्या पाऊलखुणावरुन पाठलाग करता, तेव्हा तुम्ही फरक सांगू शकत नाही, तुम्ही चतुर शिकारी असल्याशिवाय. कारण ते एकाच प्रकारच्या पाऊलखुणा करतात; जेव्हा ते धावतात, ते उड्या मारतात, आणि जेव्हा तुम्ही एखादा दुरवर उभा असलेला पाहता, त्याचे डोके लपवलेले असते. का? तुम्हाला—तुम्हाला क्वचितच फरक कळतो. ते शेपटीच्या भागात अंदाजे सारख्याच आकाराचे असतात; ते सफेद असतात, अगदी हरणासारखे. त्यांच्याशी बोलणे खूप कठीण असते. परंतु त्यांची शिंगे त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख देतात, त्यांच्या शिंगाद्वारे मेंढरांची शिंगे गोल असतात आणि हरिणीची शिंगे तीक्ष्ण, दमदार, काट्यांसारखी असतात आणि दुसरी गोष्ट हरिण खाण्यासाठी, वस्तुतः उंचावर जात नाही.

15 आणि नंतर बकरी, चालतानादेखिल, तेथे बकरीमध्ये एक स्वभाव वैशिष्ट्य असते, आणि एक मेंढी, की तुम्हाला त्यांच्यातील फरक कळला पाहीजे, जेव्हा तुम्ही वर असता, कारण ते दोघेही उंच डोंगरात राहतात. तुम्हाला फरक कळला पाहिजे. परंतु जर तुम्ही निरीक्षण केले, एक—एक बकरी चालत असता स्वतः अडखळते; जेथे, मेंढा चालताना त्याचे पाय खाली *अशाप्रकारे* टाकते. त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे तो त्याच्या पाऊलखुणा करतो. तुम्हाला तुमच्या शिकारीच्या जनावराची ओळख, त्या स्वभाव वैशिष्ट्यानुसार होते. ते काय करतात आणि कसे वागतात आणि ते काय खातात आणि सर्व गोष्टी. त्यांची ओळख त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यानुसार होते. आणि तुम्ही उडी मारता आणि पाहता तेथे काय घडते, तुम्ही सांगू शकता की, ते त्या मार्गाने गेले. तुम्ही निरनिरा□या प्राण्यांची स्वभाववैशिष्ट्ये सांगू शकता.

16 तुम्ही कधी अवलोकन केले आहे का, मला माहीत नाही की, तुमच्या येथे ते आहेत किंवा नाही. यलोहमर्स; ठीक आहे. फडफडणे हे त्यांच्यासाठी योग्य नाव आहे. तसेच, एक जयपक्षी. जयपक्षी येलोहॅमर्सच्या आकाराचाच आहे. आणि तुम्हाला माहित आहे दोघे उडणारे आहेत. ते दोघेही साधारणपणे एकाच जातीचे पक्षी आहेत. जर तुम्ही रंग बघू शकत नाही, परंतु त्यांचे फक्त निरिक्षण करा, तुम्ही येलोहॅमर कोण आहे, हे सांगू शकता. जय पक्षी उडतो; हा काहीसा मधमाशीसारखा आहे. परंतु येलोहॅमर्स, त्याचे पंख उडवतो. जसे तो त्याचे पंख उडवतो तो खाली जातो आणि मग वर–खाली आणि मग वर. पाहा, तो त्याला स्वतःला बंधन घालतो, *अशाप्रकारे*, आणि तुम्ही त्यांच्या उडण्याच्या प्रकाराद्वारे त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये सांगू शकता.

17 जर तुम्ही क्वेल पक्षी पाहीला. जेव्हा तो बाहेर येतो. तो अशाप्रकारे वर येतो आणि तुम्ही जर दलदलीच्या प्रदेशात असाल, जेथे क्वेल पक्षी आणि दलदलीच्या प्रदेशात आढळणारा लांब चोचीचा पक्षी तुम्हा शिकार्यांना ते माहीत आहे. विल्सन येथील दलदलीच्या प्रदेशात आढळणारा लांब चोचीचा पक्षी आणि जॅक येथील पक्षी ते त्यांच्या बाहेर जाण्याचा आणि आत येण्याच्या त्यांच्या सवयीनुसार ओळखले जातात. ते त्यांच्या उडण्याच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे ओळखले जातात की, ते कोणत्या प्रकारचे पक्षी आहेत. त्या कारणामुळे जर तुम्ही फक्त त्यांना ऐकाल, तुम्ही ते कोण आहे, ते सांगू शकता. ज्या प्रकारे तो बाहेर जातो, तो कोण आहे, त्याच्या उडण्याच्या स्वभाववैशिष्ट्याद्वारे.

18 त्याच प्रकारे एक पुरुष आणि एक स्त्री ते दोघेही मनुष्य आहेत; परंतु स्त्रीची स्वभाव वैशिष्ट्ये पुरुषापेक्षा वेगळी आहेत. काही काळा अगोदर मी येथे शलमोन आणि राणी ह्या विषयी वाचत होतो. माझ्याकडे तुम्हाला प्रचार करण्यासाठी येथे माझा लहान संदेश. दक्षिणेची राणी जी शलमोनाला भेटण्यासाठी आणि त्यांची पारख करण्याचे दान पाहण्यासाठी आली, मी त्या विषयी वाचत होतो, येथे फार काळ लोटला नाही, आणि ते म्हणाले की, "शलमोनापुढे असलेल्या अनेक कोड्यांपैकी एक होते, ते हे होते, ह्या राणीने एका स्त्रीला किंवा स्त्रीयांना घेतले आणि त्यांना पुरुषांसारखे कपडे घातले."

19 आता ते त्या दिवसात अपरिचित होते, परंतु आज ते निश्चतच अद्यावत आहे, आणि – आणि तुम्हाला माहीत आहे ते चुकीचे आहे. बायबल सांगते की, एका स्त्रीने ते करु नये. "स्त्रीने पुरुषाचे कोणतेही वस्त्र घालणे, हे तिच्यासाठी घृणास्पद आहे" आणि न बदलणारा परमेश्वर तसे बोलला आहे, म्हणून ते सत्य आहे.

20 म्हणून आपल्याला कळते की, शलमोन, त्यांना पाहण्याशिवाय अधिक करु शकला नाही. त्यांनी त्यांना चालताना किंवा काहीतरी करताना पाहीले, आणि लगेच बोलला.

"त्या स्त्रीया आहेत." पाहा, तो त्या स्त्रीच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे सांगू शकला, ज्या प्रकारे तिने तिला स्वतःला हाताळले की, ती स्त्री होती आणि पुरुष नव्हता.

21 आणि काहीही गोष्टी त्याप्रकारे, त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांशी निगडीत आहेत. त्याचप्रमाणे जसे काही लोक डावरे असतात, आणि उजवे असतात, ते त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये असतात. ज्याप्रकारे ते वागतात, तुम्ही सांगू शकता की, तो उजवा आहे की डावखुरा आहे, ज्याप्रकारे ते वागतात, ज्या प्रकारे ते नेहमी डाव्या हाताने किंवा उजव्या हाताने करतात

आणि लक्षात ठेवा येशूकडे तसे काहीतरी होते की, की...

22 दोन्ही हात बहुतेक करुन...सारखेच असतात. त्यांचे अंगठ्याचे ठसे, बोटांचे ठसे, पाच बोटे लहान. पहिले बोट, आणि असेच सर्व सारखेच असते. उजव्या हातासारखेच डाव्या हाताची तशीच बोटे. बहुदा हातांचा सारखाच आकार असतो. अगदी सारखेच असते. आणि फक्त एकच फरक त्यांच्यात असतो, तो म्हणजे एक डावा, आणि दुसरा उजवा आहे. तेथे एकच फरक आहे, जो तुम्ही सांगू शकता. एक डावा आणि दुसरा उजवा आहे.

23 म्हणून तेव्हा त्यांस येशू म्हणाला...येथे मी एक मुद्दा सांगू इच्छितो. मत्तय 24 मध्ये येशू म्हणाला की, "शेवटच्या दिवसात आत्म्याची स्वभाव वैशिष्ट्ये अशी असतील की, ते साधेल तर निवडलेल्यांस देखील फसवतील." पाहा, ते अगदी...

24 तुम्ही तुमचा हात घ्या आणि जरा तो वर करा. पाहा, जर तुम्ही सर्व बाजूंनी लक्ष दिले नाही. त्यांच्यातील एक दुसऱ्यासारखाच दिसतो, परंतु त्यांच्यातील एक डावा आणि दुसरा उजवा आहे.

25 तशाच प्रकारे अंतिम दिवसात आत्मे आहेत. ते काहीसे सारखेच आहेत; परंतु त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये आहेत. ज्यावरुन ते ओळखता येतात. एक बरोबर आहे, आणि दुसरा चुकीचा आहे, आणि ते त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे ओळखता येतात.

26 देवाचा आत्मा त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यानुसार ओळखता येतो. समजले? देवाचा आत्मा, आणि मंडळीचा आत्मा तेथे मंडळीचा आत्मा आहे, आणि देवाचा आत्मा पूर्णपणे मंडळीच्या आत्म्यासारखा, मुळीच नसतो.

तेथे एक संप्रदायाचा आत्मा असतो.

27 तेथे राष्ट्राचा आत्मा असतो. तेथे राष्ट्राचा आत्मा असतो. प्रत्येक राष्ट्राचा, जेव्हा मी तेथे जातो, तुम्ही तेथे जाता तुम्हाला एक वेगळा आत्मा आढळतो. मी फीनलँडमध्ये गेलो, चांगले लोक, परंतु तेथे एक फिनिश आत्मा होता. मी जर्मनीत जातो, तेथे जर्मनचा आत्मा आहे.

28 येथे फार काळ गेला नाही, काही वर्षांअगोदर जेव्हा आम्ही इंडीयानात राहत होतो; मी माझ्या पत्नीसमवेत एका लहान सुपरमार्केटमध्ये जात होतो. मी आताच घरी आलो होतो. आम्हाला काही खाणे आणण्याकरीता जायचे होते आणि तेथे माझ्या मार्गावर, आम्ही...तो उन्हाळ्याचा समय होता. तुम्ही ह्यावर कदाचित विश्वास ठेवणार नाही, परंतु आम्ही एका स्त्रीला पाहीले; जिने एक पोषाख घातला होता आणि तो इतका विचित्र होता...त्याने मला धक्का बसला. मी, मी म्हणालो, "तेथे पाहा ती स्त्री विचित्र दिसते. तिने पोषाख घातलेला आहे." त्यांच्यातील इतरांनी कपडे घातले होते, जो...स्त्रीसाठी बनवलेला नव्हता. आणि — आणि ती म्हणाली...मी म्हणालो, "तो केवळ अमेरिकेचा आत्मा आहे, पाहा, अमेरिकेचा आत्मा."

29 आता, अमेरिकेचा आत्मा, हा...ते एक ख्रिस्ती राष्ट्र मानले जाते, परंतु ह्या राष्ट्राचा आत्मा ख्रिस्ती नाही. ते कदाचित ख्रिस्ती राष्ट्र म्हणून संबोधले जात असेल. परंतु त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यात ते लाखो मैल त्यापासून दूर आहे. म्हणून ती स्त्री, मी म्हणालो...

ती म्हणाली, "बरे, आपण अमेरिकी नाहीत का?"

30 मी म्हणालो, "नाही. आम्ही येथे राहतो. हे आमचे राष्ट्र आहे. आम्ही—आम्ही—आम्ही ह्यामध्ये राहतो. आम्ही ह्यावर प्रेम करतो. हे जगातील सर्वोत्कृष्ट राष्ट्र आहे. परंतु, तरिही आम्ही अमेरिकी नाही." मी म्हणालो, "आम्ही वरुन जन्मलो आहोत. पवित्र आत्मा खाली आला आणि आम्ही एका राज्याचे आहोत. ते ह्या जगाचे नाही." मी म्हणालो, "तेच कारण आहे की, आमच्या बहिणी पोषाक घालतात; लांब केस ठेवतात; मेक-अप करीत नाही. पाहा, त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य. त्यांची ओळख. 'प्रभूला पवित्र' अशी करुन आहे."

31 त्या कारणामुळे, आम्ही एक राज्य शोधत आहोत. आपण एका राजाला शोधत आहोत. जो येईल आणि त्याच्या प्रजेला त्याच्या राज्यात नेईल. आणि ते त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे ओळखले जातात. त्यांची संपत्ती ह्या पृथ्वीवरील किंवा ह्या राष्ट्राची नाही. ती वरुन गौरवातील आहे. म्हणून, ते "अशा शहराचा शोध करीत आहेत, ज्याचा बांधणारा आणि बनविणारा परमेश्वर आहे." ते खऱ्या अर्थाने ओळखले जातात.

32 मला वाटते, माझा आवाज तुम्हाला रात्री प्रचार करण्यासाठी पुरेसा आहे. परंतु मी—मी त्यापासून दूर जातो. आता, त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे ओळखले जातात.

33 आपल्याला इस्त्राएलच्या समयातील एक चांगले उदाहरण येथे मिळते. जे वचनदत्त देशात आले. आणि देवाने त्यांना त्यांच्या अभिवचनानुसार बोलावले. त्याने अब्रहामाला म्हटले की, "तो त्याची संतती ह्या परक्या राष्ट्रात, चारशे वर्षे राहील, आणि मग तो त्याला त्याच्या महान सामर्थी हाताने सोडवील. आणि ते नंतर एका देशात गेले, जो अभिवचनाचा होता, जेथे दूधाचे आणि मधाचे प्रवाह वाहत होते." आणि जेव्हा तेथे अभिवचनाचा समय जवळ आला, तेथे फारो आला. ज्यास योसेफची महान कृत्ये जी त्याने त्यांच्यात केली होती, त्याची माहीती नव्हती.

34 आणि देवाने मोशे नावाचा संदेष्टा उभा केला आणि ह्या मनुष्याला मिसरातील सर्व ज्ञान शिकविले होते. ह्यात संशय नाही. परंतु तो एक महान, चलाख, विद्वान मनुष्य होता, कारण तो मिसरी ज्ञान शिकवू शकत होता. दिसण्यास अगदी योग्य सोडवणूक करण्यासाठी योग्य मनुष्य होता.

35 परंतु तुम्हाला माहित आहे; ज्यास आपण कशास सोडवणूक म्हणतो, आणि देव कशास सोडवणूक म्हणतो, ह्यात काही फरक आहे.

36 आता लक्ष द्या. मनुष्य त्याच्या सर्व नितीमुल्यांसहित होता. त्याला ठाऊक होते, त्याचा जन्म इस्त्राएलाच्या संततीची सुटका करण्यास झाला आहे. तरिही, त्यांच्या सर्व शिक्षणासह ज्या सर्वांविषयी त्याला माहित होते, आणि माहीत होते की, त्याला देवाने हे काम करण्याकरिता बोलावले आहे. त्याच्याकडे त्याचे सर्व...त्याच्याकडे त्याची कलेची पदवी, आणि त्याची पी. एच. डी., आणि एल. एल. डी. आणि अशाच अनेक आणि तो इस्त्राएलाची सोडवणूक करण्यास गेला, आणि पूर्णतः अयशस्वी ठरला.

37 आता लक्ष द्या, असे दिसत होते, त्याचा पाय मिसराच्या सिंहासनावर फारो बनण्यासाठी होता की, तो इस्त्राएलाच्या संततीची सुटका फारो झाल्यानंतर करु शकत होता, कारण तो त्या सिंहासनासाठी पुढील व्यक्ती होता. परंतु, तुम्हाला समजले

की, त्याप्रकारे करताना देवाची स्वभाव वैशिष्ट्ये लोकांना सोडविताना ओळखता आली नसती.

38 तो म्हणाला, तो त्यांना सोडवील. *तो* “त्यांना त्याच्या सामर्थी हाताने सोडविल.” मोशे त्याच्या सामर्थी सैन्याने नव्हे, परंतु परमेश्वर आपल्या सामर्थी हाताने.

39 आपण पाहतो की हा संदेष्टा पळून जातो आणि रानात चाळीस वर्षांसाठी राहतो. फारोला त्याच्यामध्ये शिक्षण घालण्यास चाळीस वर्षे लागली आणि देवाने ते त्याच्यातून काढण्यास चाळीस वर्षे घेतली. म्हणून आपण पाहतो, एके दिवशी तो वाळवंटामागे, प्रभू परमेश्वराला एका जळत्या झुडुपात भेटतो, अग्नि स्तंभाच्या रुपात एका झुडूपात पाहतो आणि त्याला त्याचे पायजोडे काढण्यास सांगितले जाते की, ज्या भूमीवर तो उभा होता, ती पवित्र होती. आता ज्या चांगल्या, सुसंस्कृत, सुशिक्षीत व्यक्तीकडे पाहा. जो होता, त्याला देव भेटल्यानंतर बदललेल्या स्वभाव वैशिष्ट्यांकडे लक्ष द्या…

40 कधी कधी देव गोष्टी अशा साध्या रितीने करतो, आणि अशा मुर्ख रितीने करतो, असे ऐहीक विचार करणार्यांना वाटते. लक्ष द्या. एक मनुष्य जो पूर्णतः अपयशी झाला होता, त्याच्या सर्व मिसरी सैन्यांसह आणि त्याच्या सभोवतालच्या सगळ्या गोष्टी देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठी त्याच्या सर्व शिक्षणाने, त्याच्या वयाच्या चाळीसाव्या महत्त्वाच्या वर्षी. येथे तो ऐंशी वर्षांचा आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी, त्याची बायको खेचराच्या दोन्ही बाजूला पाय टाकून बसली आहे. तिच्या लेकरांसह, आणि एक काठी त्याच्या हातात, मिसराकडे ते घेण्यासाठी निघाला. तुम्ही हास्यास्पद दृश्याबाबत बोलता! परंतु तो देवाचे स्वभाव वैशिष्ट्य प्रगट करीत होता, कारण त्याच्याकडे एक मनुष्य होता, जो त्याच्या वचनावर विश्वास ठेवील, तेच सर्व आहे. ही गोष्ट अशी होती, तुम्ही कल्पना करु शकता की, एक मनुष्य स्वारी करण्यासाठी मिसरास निघाला, जेथे एक सैन्य अपयशी ठरले होते. परंतु ते काय होते? त्याचे स्वभाव वैशिष्ट्य, त्याच्या युक्ता बदलल्या होत्या. तो प्रभूच्या नावाने चालला होता. “मी जो आहे तो आहे.” ती गोष्ट अशी त्याने जिंकली. त्याने केले कारण, तो प्रभूच्या सामर्थ्याने चालला होता.

41 त्याच्या मार्गात, इस्त्राएलाला वचनदत्त देशाकडे नेत होता. तो त्याच्या भावाच्या संपर्कात आला, त्याच्या संप्रदायातील भाऊ मवाब. आता मवाब अधर्मी व्यक्ती होता. तो लोटाच्या मुलीचे संतान होता. त्यांच्यातून निघालेली एक संतती मवाब होती.

42 आता तेथे वर, मला वाटते की, तुम्ही ह्या दोन राष्ट्रांकडे लक्ष द्यावे; जे विरुद्ध आहेत. येथे मिसर होता. एक लहान विखुरलेले जाण्यासाठी दुसरे राष्ट्र नाही. कोणी अंमलदार किंवा राजा नाही किंवा कोणीच नाही. किंवा त्यांच्यात कोणी मान्यवर नाही. फक्त लोकं त्यांच्या वचनदत्त देशाच्या मार्गवर आणि येथे त्यांना मवाबच्या देशातून जावे लागणार होते. ते वचनाच्या दृष्टीने योग्य होते.

43 आणि मवाब ही यहोवावर विश्वास ठेवणारा होता, आणि त्यांच्याकडे एक संदेष्टा होता आणि इस्त्राएलाकडेही संदेष्टा होता. दोघांकडे संदेष्टे होते.

44 आणि आता लक्ष द्या, ते अशा जागी आले होते, जेथे त्या संघटीत राष्ट्राचा संदेष्टा ह्या इतर राष्ट्राला शाप देण्यासाठी खाली येत होता; कारण ते प्रवासी होते, राहण्यासाठी ठराविक जागा नव्हती.

म्हणून ते खाली आले आणि त्या दोन संदेष्ट्यांकडे पाहू लागले. जेव्हा मुलभूत रितीने पाहिले, ते दोघेही अगदी बरोबर होते; कारण, बलामाला पाहा, जो बिशप त्यांना म्हणाला, “आता तुम्ही माझ्यासाठी सात वेद्या बांधा.”

45 सात हा देवाचा पूर्ण क्रमांक आहे, जो सात मंडळी युगाला, निर्मितीच्या सात दिवसांना दर्शवितो, असेच पुढे. आता लक्ष द्या. सात, देव सातमध्ये पूर्ण होतो.

46 "सात वेद्या आणि प्रत्येक वेदीवर एक—एक बैल ठेवावा." आता, ती अगदी तीच वेदी होती, जी इस्त्राएलाच्या छावणीत होती. तेथे खाली ते इस्त्राएलात होते. तीच वेदी येथे वर होती. आणि तोच यज्ञ, एक बैल आणि एक बैल; संदेष्टा आणि एक संदेष्टा दोन राष्ट्रे परस्परविरोधी.

47 ह्या दिवसांत ज्यात आपण राहत आहोत, त्याचे परिपूर्ण उदाहरण, जर आपल्याकडे– त्यात जाण्यासाठी वेळ असता. लक्ष द्या, देव हे दाखल्यात करत होता की, आपण तुलनेत पाहू शकतो.

48 आता, बलामाला प्रत्येक वेदीवर एक मेंढा हवा होता. ते त्याच्या येणाऱ्या मसीहावरील विश्वास प्रगट करीत होते. एक मेंढा, नर मेंढा, तो तोच यज्ञ होता. जो त्यांनी खाली इस्त्राएलात, इस्त्राएलाच्या छावणीत वर येथे मवाबात केला होता. मुलभूतरित्या ते दोघेही बरोबर होते, परंतु मुलभूतरित्या शिकवणीत पाहा.

49 परंतु खाली इस्त्राएल छावणीतील एका संदेष्ट्याकडे देवाचे स्वभाव वैशिष्ट्य होते आणि देवाचे वचन, तो त्या युगासाठी असलेल्या अभिवचनासह होता, कारण, तो वचनदत्त देशाकडे जाणाऱ्या मार्गात होता. समजले?

50 आता, मुलभुतरित्या पाहिले. बलाम, बलाक मोशेसारखाच ओळखला जात होता.

51 परंतु, तुम्ही पाहीले, मोशे, देवाचा खरा संदेष्टा असल्याने त्याच्याकडे केवळ मुलभूत गोष्टीच नव्हत्या. परंतु देवाची ओळख होती. समजले, तो त्या समयाच्या अभिवचनाच्या कर्तव्य मार्गात होता. नोहाच्या समयाच्या नाही, परंतु त्या समयासाठी "मी तुला अशा भुमीत नेईन जेथे दूधाचे आणि मधाचे प्रवाह वाहतात." ते त्यांच्या मार्गावर होते, आणि इस्त्राएल त्यांचा संदेष्टा मोशे त्या समयाच्या संदेशाने ओळखला जात होता. देवाचे स्वभाव वैशिष्ट्य मोशेत दिसत होते. अग्निस्तंभ त्याच्यामागे चालत होता. त्याच्या कृतीत प्रायश्चित्त होते, शब्दात नव्हते, परंतु कृतीत होते. काय होणार ह्यात नाही, आता काय आहे!

52 लक्ष द्या, त्याच्याकडे पितळी सर्प होता. जो लोकांच्या आजाराकरिता आणि रोगांकरिता उंच केला गेला होता. म्हणजे मोशे देवी आरोग्याचे प्रात्यक्षिक करीत होता. त्याच्याकडे प्रायश्चित होते, पितळी सर्प दर्शवीत होता की, देव त्यांच्या छावणीत आहे, आणि लोक त्या पितळी सापाकडे पहात होते आणि बरे होत होतो.

53 त्याच्याकडे त्याच्यामागे चालणारा प्रहार झालेला खडक होता आणि तो त्यांच्यामध्ये जीवनाचे पाणी, आनंद आणि तारण ठेवण्यासाठी देवाची ओळख देत होता; ह्यासाठी की, त्यांनी नाश पाऊ नये, परंतु त्यांना सार्वकालिक जीवन मिळावे. ते दर्शक होते…तो रानातील प्रहार झालेला खडक प्रहार झालेल्या ख्रिस्ताचे दर्शक आहे.

54 नंतर, ते अभिवचनाप्रमाणे प्रवास करित होते. ही एक दूसरी ओळख जे, देवाचे स्वभाव वैशिष्ट्य दाखवते. हे मुलभूतरित्या किती वचनाबरोबर होते, ह्याविषयी काही नाही; त्याच्याकडे मुलभूत गोष्टी होत्या. तसेच ओळख आणि देवाचे स्वभाव वैशिष्ट्य त्यांच्यात होते. देव स्वतः त्यांची ओळख देतो. दोन संदेष्टे, ते दोघेही संदेष्टे आणि दोघेही मुलभूत विश्वासणारे. परंतु देव त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख मोशेमध्ये देत होता. कारण त्याच्याकडे देवाची स्वभाव वैशिष्ट्य त्याच्यासह होती.

55 आता पुन्हा, देवाची स्वभाव वैशिष्ट्ये नेहमीच अद्भूत असतात. कारण तो अद्भूत आहे. देव अदभूत आहे. ते नेहमीच ह्या आजच्या आधुनिक युगाच्या विचारांसाठी असामान्य

आहे. तुम्हाला ते माहीत आहे. देवाने नेहमीच योजनांचा नायनाट करुन नाराज केले आहे. कारण प्रत्येक युगातील धार्मिक समुह जे होऊन गेले.

56 आणि एकदाही एकाही व्यक्तीने किंवा लोकांच्या समुहाने त्यांना संदेशावर संघटीत केले नाही. परंतु जे मरण पावले आणि ते निघून गेले आणि कधीच पुन्हा उघडले नाहीत. तेथे इतिहास नाही. लुथरन्स, प्रेसबेटेरियन्स, मेथॉडिस्ट, बापटीस्ट, पेंटीकोस्टल्स, आणि असे अनेक कधीच पुन्हा उठले नाही; जेव्हा ते संघटीत होण्यास गेले,

देव व्यक्तींबरोबर व्यवहार करतो.

57 लक्ष द्या, तो ह्या प्रकारच्या विचारांसाठी इतका असामान्य आहे; पाहा, आपण एका कलाकडे वळतो आणि आपल्याला *त्या* प्रकारे विश्वास ठेवावा लागतो आणि तेव्हा परमेश्वर त्याच्या वचनासह येतो, ज्याचे त्याने अभिवचन दिलेले असते आणि त्याची ओळख त्या वचनामध्ये देतो. *हा* समुह त्याबरोबर जाऊ शकत नाही, कारण तो त्यात विश्वास ठेवीत नाही. पाहा, तो स्वतःला त्यापासून वेगळे ठेवतो.

58 योसेफासारखा, जो दाविदाचा पुत्र होता, आणि एक चांगला मनुष्य योसेफ, मरियेचा पती. तो एक चांगला मनुष्य होता आणि निःसंशय तो बायबल व गुंडाळी सतत वाचत असे. कारण...आणि मसिहा येण्याची वाट पाहत होता, आणि त्यास शास्त्रलेख माहित होता की, तसे घडणार आहे. यशया म्हणाला, “कुमारी गर्भवती होईल.”

59 आता, तो ह्या तरुण मुलीबरोबर जात होता. मरिया कदाचित अठरा वर्षे वयाची असेल, आणि तो कदाचित थोडा मोठा असेल आणि जेव्हा त्यांचे वाग्दान लग्न होण्यासाठी झाले होते. ती आई होणार असे कळते. आता ही गोष्ट योसेफासाठी कठीण होती. यात शंका नाही. परंतु मरियेने गॅब्रियेलच्या भेटीविषयी त्याला काय सांगितले. परंतु आपण पाहतो, ज्याप्रकारे त्याची स्वभाववृत्ती त्याला चालवीत होती, त्याने त्यावर संशय दर्शविला.

60 आता, त्यांचा विवाह होण्यापूर्वी ती आई होणार असल्याचे कळले. आणि बायबलमध्ये त्यासाठी शिक्षा ही मृत्यु आहे. धोंडमाराद्वारे. अविवाहीत स्त्री जी आई होणार, तिला धोंडमार केली जात असे. इस्त्राएलमध्ये वेश्या व्यवसाय नव्हता. त्यास बाहेर काढले होते. म्हणून आपण अनुवादाच्या पुस्तकात हे पाहतो, ते आपणांस हे सांगते.

61 आता आपल्याला आढळते की, मरीया. असे दिसत होते जणू काही योसेफाचा उपयोग तिने जे कृत्य केले होते, त्यापासून बचाव करण्याचा प्रयत्न करीत होती. कारण, जर ती त्यांचा विवाह होण्याअगोदर आई होणार होती हे कळले होते, तेव्हा तिला धोंडमार केलाच पाहीजे आणि आता तिला कोणीतरी हवे होते, जो तिच्यासाठी रक्षणकर्ता म्हणून उभा राहू शकेल आणि तसे दिसत होते ही शक्यता होती. ते जणू काही ते ती करण्याचा प्रयत्न करीत होती.

62 परंतु योसेफ तिच्या मोठ्या सुंदर डोळ्यांत पहात होता आणि ती म्हणाली, “योसेफ, गॅब्रीएल मला म्हणाला, ‘पवित्र आत्मा तुजवर छाया करील आणि तू गर्भवती होशील—तुझ्यामध्ये जो गर्भ आहे, तो पवित्र आत्म्याचा आहे. त्यास “देवाचा पुत्र” असे संबोधले जाईल.’” आणि योसेफ, तो—तो, त्याला ह्यावर विश्वास ठेवायचा होता; परंतु ते इतके असामान्य होते. तसे पूर्वी कधीच घडले नव्हते.

63 आणि आजही अगदी तसेच आहे. जर आपण...जर माझ्याकडे लोकांना एखाद्या असामान्य गोष्ट दाखवण्याचा मार्ग आहे; जर तो वचनाद्वारे ओळखला जातो, तर त्याचे स्वभाव वैशिष्ट्य ते काय आहे हे सिद्ध करतात. तेथे देव कार्यरत आहे.

64 योसेफाला हे माहीत असावयास हवे होते. त्याला माहित हवे होते की, "एक कुमारी गर्भवती होईल." परंतु तो त्याविषयी प्रामाणिक होता. तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणे सोडण्याचा, परंतु, तो—तो विचार करीत होता.

65 आणि जेव्हा प्रभूच्या दूताने त्याला स्वप्नात दर्शन दिले. तुम्हाला कधी ह्याचे आश्चर्य वाटले की, त्याने स्वप्नात दर्शन दिले? त्या दिवसात त्यांच्यात कोणी संदेष्टे नव्हते. त्यांचे स्वप्न इतके सोपे होते, त्याचा अर्थ सांगण्याची गरज नव्हती. म्हणाला, "योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तू मरियेचा आपली पत्नी म्हणून स्विकार करण्यास अवमान करु नकोस, कारण तिच्या पोटी जो गर्भ आहे, तो पवित्र आत्म्यापासून आहे." समजले, तेव्हा ते ठीक झाले, समजले. तो त्याच्याकडे स्वप्नात आला दुसऱ्या पद्धतीने. परंतु तुम्हाला समजले; तेथे त्या वचनाची ओळख देण्यास कोणी संदेष्टा नव्हता की, "हीच ती कुमारी आहे, जी गर्भवती होईल." समजले? म्हणून त्याने त्याला स्वप्नात दर्शन दिले; कारण तो प्रामाणिक होता आणि नीतिमान आणि एक चांगला मनुष्य होता.

66 आणि मी विश्वास करतो की, देव कोणत्याही चांगल्या मनुष्याकडे, कोणत्यातरी मार्गाने येईल, आणि त्याची कृत्ये त्या चांगल्या मनुष्यास प्रगट करील, त्या समयासाठी जर, तो मनुष्य त्या समयासाठी देवाने बोलावलेला आहे.

67 आता, परंतु ते इतके असामान्य होते, ते हे समजू शकत नव्हते. परंतु सदैव त्या समयासाठी असलेल्या अभिवचनानुसार प्रकट झाला, हे सर्व नेहमीपेक्षा वेगळे.

आता तेथे काही लोक बाजूला जात असतील आणि म्हणत असतील, "हे अद्भूत आहे. तो परमेश्वर आहे, हे असामान्य आहे."

68 परंतु तुम्हाला समजले, त्याची ओळख वचनाद्वारे झाली पाहीजे आणि वचनचं परमेश्वर आहे, समजले? आणि मग ह्या ओळखीचे स्वभाव वैशिष्ट्य ओळख देते ते कोण आहे? कारण देव बोलला आहे, "हे घडेल," आणि ते घडले, समजले? त्याचे स्वभाव वैशिष्ट्य देवाचे वचन त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे प्रकट होणे.

69 तो म्हणाला अंतिम दिवसात तो पवित्र आत्म्याचा वर्षाव करील, त्याने ते केले. त्याचे स्वभाव वैशिष्ट्य ओळख देते की, तो देव होता. त्याने वचन दिले, समजले. ते नेहमी त्याची ओळख देते.

70 आता, नेहमी, प्रत्येक वेळी, वचनाची सुधारणा करते, जेव्हा वचनाला चुकीचे म्हणण्यात येते. तुम्ही ह्याचे कधी अवलोकन केले का? ते नोहाच्या दिवसात होते, वचनाने त्या वैज्ञानिक युगाला सुधारले की, देव आकाशातून पाणी खाली आणणार आहे. ते मोशेमध्ये होते. पाहा, त्याने सुधारणा केली. जेव्हा, ते सर्व मिसरात स्थायिक झाले, आणि असेच किती, परंतु देवाचे वचन ओळखले पाहीजे आणि वचनाचे सत्य चुक सुधारते.

71 मला तुम्हाला काही विचारु द्या. आपण येथे थोडे खोल जाऊया. मी येथे कोणती शिकवण किंवा सिध्दांत प्रचार करीत नाही. परंतु, मला तुम्हाला एक गोष्ट विचारु द्या.

72 येशू वचन होता. आपल्याला ते माहीत आहे. बायबल तसे सांगते की, तो होता. संत योहान पहिला अध्याय "प्रारंभी शब्द होता आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता आणि शब्द देही झाला आणि आम्हामध्ये वस्ती केली." तो अजूनही शब्दच आहे. मग जेव्हा तो त्यांचे विचार ओळखू शकत होता, त्यांना कळायला पाहिजे होते की, तो शब्द होता. कारण देवाचे वचन सांगते की, तो काय करु शकतो. तो संदेष्टा होता.

73 आता लक्ष द्या. आपल्याला कळते की, जेव्हा तो जन्माला आला होता, तेव्हा तो सुमारे बारा वर्षे वयाचा. तो मंडपाच्या सणाकरिता वर गेला आणि ते तेथे वल्हांडण

सणासाठी गेले आणि ते परतत असताना त्यांनी तीन दिवसांचा प्रवास केला आणि त्यांनी त्याला गमावले; असे समजून, विचार करुन, की, तो त्यांच्या नातलगामध्ये आहे.

74 आपण त्यामधून धडा घेऊ शकतो, आज असे खुप आहे! आता तुम्ही मेथॉडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेसबेटिरियन्स, लुथरन, व कॅथॉलिक तुम्ही कोणीही असा. पाहा, तुम्ही त्याच गोष्टी करित आहात. तुमची अशी समज झाली आहे की, वेस्लीकडे महान संजीवन होते, लुथरनकडे महान संजीवन होते, किंवा पेंटीकॉस्टलकडे महान संजीवन होते आणि तुमची अशी समज झाली आहे की, तो त्या लोकांमध्ये आहे, जेव्हा तो त्यांच्यात कधी कधी नसतो.

75 ते त्याला शोधण्यास निघाले, त्यांना तो कोठे भेटला? त्यांनी त्याला यरुशलेमेत कोठे सोडले? आणि त्यांना तो जेव्हा सापडला, तो काय करित होता? एक लहान मुलगा, बारा वर्षे वयाचा, कदाचित कधीच शाळेत प्रवेश न केलेला फक्त त्यांच्या आईने त्याला शिकवले होते. आणि येथे तो मंदीरात होता. त्या याजकांशी देवाच्या वचनाविषयी वाद–विवाद करित होता. आणि ते ह्या मुलाचे ज्ञान पाहून थक्क झाले, का? तो शब्द होता आता लक्ष द्या.

76 आणि आता तुम्हा कॅथॉलिक लोकांचा मी अपमान करीत नाही की, तुम्ही मरियेला देवाची आई म्हणता, परंतु मला जरा तुम्हाला येथे एक लहान चूक दाखवू द्या. जर मंडळी ही मरीयेवर बांधली तर पाहा, काय घडेल. आता ती वर आली आणि ती म्हणाली, “पाहा तुझा बाप व मी कष्टी होऊन तुझा शोध करीत आलो.” ते वाक्य पाहा, ती नंतर तिःच्या साक्षीला दोष देते. ती म्हणाली, “तुझा बाप व मी कष्टी होऊन तुझा शोध करीत आलो.”

77 वचनाकडे पाहा. तो वचन होता. तो म्हणाला, “माझ्या पित्याच्या घरात मी असावे, हे तुमच्या ध्यानात आले नाही काय?” पाहा वचनाने चुक सुधारली. तेथेच त्या याजकांसमोर तिने तिची साक्ष बिघडवली, म्हणाली ती पवित्र आत्म्याद्वारे गर्भवती राहिली होती आणि तेथे ती म्हणाली, योसेफ त्याचा “पिता” आहे. पाहा, ते वचनाने लगेच पकडले? तो वचन होता. आता, तुम्हाला माहित आहे, एक बारा वर्षाचा मुलगा ते करणार नाही. तो वचन होता. तो त्या समयाचे बोलले गेलेले वचन होता. म्हणून ओळखलेली देवाची स्वभाव वैशिष्ट्ये ख्रिस्तात होती. त्याने चुकांची सुधारणा केली. तो म्हणाला...

ते म्हणाले, “का, आम्ही मोशेचे शिष्य आहोत.” समजले?

78 तो म्हणाला, “जर तुम्ही मोशेचे शिष्य असता, तुम्ही मला ओळखले असते. त्याने माझ्याविषयी लिहीले. मोशे म्हणाला, ‘प्रभू तुमचा परमेश्वर माझ्यासारखा एक संदेष्टा उभा करील.’ जर तुम्ही मोशेला ओळखले असते, तर तुम्ही मला ओळखले असते.”

79 आणि पाहा, वचन नेहमीच त्या दिवसांतील चुकांची सुधारणा करते. परंतु लोकांना त्यावर विश्वास ठेवण्यास आवडत नाही. ते तसेच लटकत राहतात.

80 परंतु येशूने त्याच्या स्वतःच्या आईची चुक सुधारली आणि त्याची आई चुकीची होती कारण तिने अगोदरच सांगितले होते की, हा मुलगा तिला पवित्र आत्म्याद्वारे झाला आहे आणि येथे तिने आपली साक्ष बदलली आणि म्हणाली की, योसेफ त्याचा “पिता” येशूचा पिता आहे. आता योसेफ जर...

81 जर तो योसेफाचा पुत्र होता, तर तो त्याच्या पित्याच्या कामात असता, तो खाली सुताराच्या दुकानात गेला असता.

82 परंतु तो त्याच्या पित्याच्या कामात, वर तेथे मंदिरात होता. त्या संघटनाचा निषेध करीत होता. समजले? तो त्याच्या पित्याच्या कामात होता. फक्त बारा वर्षे वयाचा मुलगा "माझ्या पित्याच्या घरात मी असावे हे तुमच्या ध्यानात आले नाही काय?"

83 तुम्ही हे पाहिले का? जेव्हा येशूला सैतानाकडून मोह दाखविण्यात आला. तेथे त्याचे स्वभाव वैशिष्ट्य, जेव्हा तो त्याच्या मोहात होता, त्याने देव असल्याची ओळख दिली, कारण तो वचनाबरोबर राहिला, समजले. सैतान म्हणाला, "असे लिहीले आहे."

येशूने म्हटले, "असेही लिहीले आहे," तो बरोबर वचनासोबत राहीला.

84 "देवाने प्राचीन काळी" आपण येथे वाचतो, "देवाने प्राचीन काळी" पूर्वी, "प्रकाराप्रकारांनी, अनेक प्रकारे," त्याची ओळख त्याच्या "संदेष्ट्यांना दृष्टांताद्वारे दिली." ते एका संदेष्ट्याचे स्वभाव वैशिष्ट्य होते, जेव्हा त्याने गोष्टी अगोदरच सांगितल्या आणि त्या घडल्या. आता ती त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची त्याची ओळख होती. तो देव त्याच्या बरोबर होता. तेव्हा त्यामुळे त्या दिवसात देवाचे वचन अनुवाद करण्याचा त्याला अधिकार दिला, कारण "देवाचे वचन संदेष्ट्याकडे येते." संदेष्ट्याचे स्वभाव वैशिष्ट्य हे की, देवाने अगोदरच सांगितले आहे.

85 बायबल सांगते, "जर तेथे कोणी एक आहे आणि तो जे बोलतो त्याप्रमाणे घडले, तर तुम्ही त्याचे ऐका. परंतु जर तसे घडले नाही, त्याच्यावर विश्वास ठेवू नका, त्याची भिती बाळगू नका. परंतु माझे...जर—जर माझे वचन त्याच्यामध्ये नाही. परंतु जर त्याप्रमाणे घडते, तर माझे वचन त्याच्यामध्ये आहे." ही त्याची ओळख आहे. ते एक संदेष्ट्याचे स्वभाव वैशिष्ट्य आहे.

86 आता, देव, प्राचीन काळी, कशा प्रकारे तो त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख मनुष्यास व मनुष्याद्वारे बोलण्याने ज्यास संदेष्टा म्हणतात, त्यास देतो. आता बायबल सांगते, "देव प्राचीन काळी प्रकाराप्रकारांनी, पूर्वजांशी संदेष्ट्याच्याद्वारे बोलला."

87 आपण दुसरे पेत्राच्या पत्रातही वाचतो, देवाचे संपूर्ण वचन त्यांच्याद्वारे लिहीले गेले. "पूर्वजांनी पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने बायबल लिहीले." ते संदेष्टे होते. वचन त्यांच्याकडे आले आणि त्यांनी ते लिहीले. लिहून ठेवले, प्रेरणेद्वारे. प्रथम ते संदेष्टे म्हणून ओळखले गेले, नंतर त्यांनी—त्यांनी प्रेरणेची वचने लिहीली आणि त्यांच्याकडे दैवी प्रकटीकरणाचा अनुवाद होता. कारण तो देव मनुष्यामध्ये होता.

88 आता तोच मार्ग होता, ज्याद्वारे त्याने स्वतःला त्याच्या ओळखीच्या स्वभाव वैशिष्ट्यामध्ये दाखवले, त्यांचे दृष्टांत प्रकट केले, देवाचे स्वभाव वैशिष्ट्य त्यांच्यात होते, तो स्वतःस लोकांपुढे प्रकट करत गेला.

89 आता, तो एकच मार्ग आहे की, तो ख्रिस्तामध्ये होता. संदेष्टा फक्त एक लहान कण होता. ख्रिस्त देवाची पूर्णता होता आणि देव ख्रिस्तामध्ये होता. जगाचा त्याच्याशी समेट करीत होता आणि त्याचे स्वभाव वैशिष्ट्य तो काय होता ह्याची ओळख देत होता. यामुळे तो म्हणाला, "जर मी माझ्या पित्याची कामे करीत नसेल, तर त्यावर विश्वास ठेवू नका. जर माझ्यात माझ्या पित्याचे चारित्र्य नाही, तर माझ्यावर विश्वास ठेवू नका. माझ्या दाव्यांवर विश्वास ठेवू नका. जर माझ्याकडे माझ्यामध्ये माझ्या पित्याचे चारित्र्य नाही, तर त्यावर मुळीच, विश्वास ठेवू नका."

90 आता, त्याचे स्वभाव वैशिष्ट्य कधीच बदलत नाही. देव त्याचे चारित्र्य बदलू शकत नाही, नाही. जर कोकरु त्याचे चारित्र्य बदलू शकत असेल किंवा दुसरी कुठली गोष्ट त्याचे स्वभाव वैशिष्ट्य बदलू शकत असेल, तरच. कारण जोपर्यंत ते त्याच्या मुळ स्थितीत

आहे, ते मुळ स्थितीत आहे आणि जर तुम्ही काही बदलता तर, तुम्ही ते त्याच्या मुळ स्थितीतून बदलता.

91 हे अगदी असे आहे, तुम्ही एका—एका डुकरीणीला घ्या आणि तुम्ही त्यास धुऊ शकता आणि त्याच्या पायाच्या नखांना रंग लावा, जसे स्त्रिया करतात आणि ओठांना लाली लावा आणि त्याला एक सुंदर ड्रेस घाला. डुकरीणीला बाहेर काढा, ती थेट चिखलात लोळण्यास जाईल, आणि पुन्हा चिखलात लोळेल. का? ती एक डुकरीण आहे, हेच ते आहे. परंतु, आणि परंतु, तुम्हाला माहीत आहे, तुम्ही करणार नाही…

92 एक कोकरु तसे करणार नाही. तो कधीच त्या चिखलात जाणार नाही. त्याला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. ते त्याचे स्वभाव वैशिष्ट्य आहे. समजले? तुम्ही कदाचित त्याला त्याच प्रकारचे कपडे घालाल; परंतु तो खात्रीने ते करणार नाही, तो खात्रीने जाणार नाही. बाह्य स्वरुप काही नाही, ती आतील गोष्ट आहे. आता, देव सर्व जीवनाचा स्त्रोत आहे…

93 हे समजण्यास कसर करु नका. मी तुम्हाला समजण्यासाठी, माझ्यामध्ये जे सर्व आहे, त्याने प्रयत्न करत आहे, समजले. मित्रांनो हे तुमच्या चांगल्यासाठी आहे. हे तुमच्या हिता—हितासाठी आहे. समजले?

94 मी येथे फक्त दिसण्यासाठी आलो नाही. मी येथे आलो नाही की, तेथे जाण्यासाठी दुसरी जागा नव्हती. मी येथे आलो कारण, मला वाटते येथे यावे. मला वाटते की जी सेवकाई प्रभूने मला दिली आहे. ती येथे लोकांमध्ये दाखवावी आणि मी तुम्हाला हे दाखवण्याचा प्रयत्न करत आहे की, देव आता खरोखरी काय आहे. तो त्याचे दिलेले वचन आहे. तो नेहमीच वचन आहे, आणि त्याची ओळख स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे देतो. ज्याविषयी त्याने वचन दिले आहे. काही चारित्र्य ठराविक समयी दिसतात, ते वचनात असतात, तेव्हा ह्या व्यक्तीची स्वभाव वैशिष्ट्ये जे वाढले पाहीजे ते ओळख देतात की, हाच तो व्यक्ती आहे.

95 हेच कारण आहे. येशूला तसेच असणे होते. जो तो होता. त्यांनी ते पाहायला हवे होते. ह्यात आश्चर्य नाही की ते आंधळे होते. तो गोष्ट…म्हटले आहे, जरी त्याने इतके चमत्कार केले, तरी ते विश्वास करु शकले नाही, कारण यशया म्हणाला, त्यांना डोळे आहेत आणि पाहू शकत नाही; आणि कान आहेत आणि ऐकू शकत नाही, "समजले?" प्रत्येक युगात, फक्त त्याच्याच युगात नाही; परंतु प्रत्येक युगात, कसे, "देव प्राचीन काळी प्रकाराप्रकाराने," तरी ते समजू शकले नाही.

96 आता, त्याची स्वभाव वैशिष्ट्ये कधीच अयशस्वी होत नाही. ते नेहमीच सारखे असतात. लक्षात ठेवा. त्याची स्वभाव वैशिष्ट्ये देवाची स्वभाव वैशिष्ट्ये पडू शकत नाही. जर तसे झाले, तर देव अपयशी ठरला आहे. आणि बायबल सांगते इब्री 13:8 मध्ये की "येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे." म्हणून तो न बदलणारा परमेश्वर आहे. जे चारित्र्य त्याचे सुरुवातीस होते, आजही त्याचे चारित्र्य तसेच आहे. प्रत्येक मार्गाने त्याने कार्य केले आहे. कुठल्याही वेळी त्याने आजपर्यंत जी कामे केली, ती. प्रत्येक वेळी त्याच प्रकारे केली. जर त्याने ती केली नाहीत तर, त्याचे चारित्र्य बदलले आहे समजले, आणि त्याची स्वभाव वैशिष्ट्ये काही गोष्टी दाखवतील की, ती देवापासून नाहीत. समजले? म्हणून आम्हाला ते समजणार नाही कोठून…

97 जसे पौल म्हणाला, "जर कर्णा अस्पष्ट नाद काढील, तर लढाईस जाण्याची तयारी कोण करील? जर कर्णा अस्पष्ट नाद काढील?" आता जर कर्णा "माघार घेण्यासाठी" नाद काढतो, तर तसेच आपण करायला पाहीजे, माघार घ्यावी. जर कर्णा "हल्ला"

करण्यास सांगतो, तर आपण तसेच करायला पाहीजे, हल्ला करायला पाहिजे. परंतु कर्णा काय आहे? देवाचे वचन आहे. ते देवाला प्रकट करते मग ते—मग ते. “वर जा, खाली बस, माघार घे, शस्त्रांचा ठीग कर.” ते काहीही असो. तो देवाचा कर्णा वाजतो.

98 आणि अस्पष्ट नाद, जेव्हा बायबल सांगते, एखादी गोष्ट घडायला पाहीजे, कोणी म्हणते, “ओह, ते दुसऱ्या दिवसासाठी आहे.” तेव्हा तेथे अस्पष्ट नाद असतो. तेव्हा तुम्हाला काय करावे ते माहीत नाही.

99 येशूने म्हटले, “मला माझे जीवन देण्याचा आणि पुन्हा उठविण्याचे सामर्थ्य आहे.” तेथे अस्पष्ट नाद नाही.

100 स्त्री म्हणाली, “आम्हाला ठाऊक आहे मसिहा येणार आहे आणि जेव्हा तो येईल तो आल्यावर आम्हाला सर्व गोष्टी सांगेल ज्या त्याने केल्या.”

101 तो म्हणाला “मी तोच आहे.” तेथे अस्पष्ट नाद नाही. “मी तोच आहे.” ओह. आमेन.

ते म्हणाले, “आमच्या पूर्वजांनी रानांत मान्ना खाल्ला.”

102 तो म्हणाला, “ते प्रत्येक जण मेले,” तो म्हणाला, “परंतु मी स्वर्गातून देवाकडून आलेली जीवनाची भाकर आहे.” अनिश्चित नाद नाही. “मी एदेन बागेतील जीवनाचे झाड आहे.” त्याविषयी अनिश्चित नाद नाही. निश्चितच नाही. त्याविषयी काहीच अनिश्चित नाही. तो प्रत्येक गोष्टीत ज्या त्याने केल्या त्यात निश्चित होता.

103 बायबल अस्पष्ट नाद देत नाही. ते नादात देवाच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख देते.

104 येशू संत योहान 10:37 मध्ये म्हणाला, “मी आपल्या पित्याची कृत्ये करीत नसल्यास…आणि माझ्यात माझ्या पित्याचे चारित्र्य नसेल तर माझ्यावर विश्वास ठेवू नका. ते एक आहेत. ते त्याच्या चारित्र्याची माझ्यात ओळख देतात. त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची.”

105 कारण पिता वचन आहे, “प्रारंभी शब्द होता आणि शब्द देवासह होता आणि शब्दच देव होता,” आणि देवाचे स्वभाव वैशिष्ट्य त्याच्या त्या समयाच्या अभिवचनाद्वारे प्रकट केले जाते.

106 आता जर तो मोशेच्या समयात असता, ते कार्य झाले नसते. आणि जर मोशे त्याच्या वेळेत असता, तर ते कार्य झाले नसते. जर तो नोहाच्या समयात असता, ते कार्य झाले नसते किंवा जर नोहा त्याच्या समयात असता नोहा त्या दिवसासाठी काही गोष्टीची भविष्यवाणी करीत होता, आणि त्याचे स्वभाव वैशिष्ट्य आणि त्याने जे केलेले देवाच्या वचनाबरोबर त्याची ओळख देतात. मोशेनेही तीच गोष्ट केली.

107 आणि येथे येशू आला, आणि शब्द ज्याचे त्या युगासाठी अभिवचन दिले होते. ते येशू ख्रिस्तात वचनाच्या स्वभाव वैशिष्ट्याच्याद्वारे प्रकट झाले, जे देवामध्ये होते. आमेन.

108 अंतिम दिवसात सामान्य लोकांवर पवित्र आत्म्याचा वर्षाव, हे देवाच्या स्वभाव वैशिष्ट्याची लोकांबरोबर ओळख देत आहे. त्याने ते अभिवचन दिले. तो शब्द आहे. त्याने म्हटले तो ते करील. ते कोणीही मागे घेऊ शकत नाही. त्याने म्हटले तो ते करील.

109 म्हणून त्या सर्व गोष्टी ज्याचे त्याने अभिवचन दिले आहे, त्या त्याने केल्या. ते त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख देतात. होय महाशय, “त्यावर विश्वास करु नका, माझ्या दाव्यांवर विश्वास ठेवू नका, जर माझे स्वभाव वैशिष्ट्य देवाचे नाही.”

110 आता योहान 14:12 मध्ये पाहा, “जो माझ्यावर विश्वास ठेवतो,” तो म्हणाला, “माझी ओळख असते, माझे स्वभाव वैशिष्ट्य असते. मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर

विश्वास ठेवणाराही करील.” ते ओळख देते की, ख्रिस्ताचे चारित्र्य त्याच्यामध्ये आहे, त्याची स्वभाव वैशिष्ट्ये प्रकट करते. आमेन.

111 आता मला खूप धार्मिक असल्यासारखे वाटते, जरी माझा आवाज घोगरा झाला आहे. होय, महाशय, ओह बाप रे! पाहा, तेथे त्याविषयी काही चूक नाही! त्याचे जीवन! “मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील.” पाहा, ते स्वभाव वैशिष्ट्यांची ओळख देते.

112 तीच गोष्ट त्याने सांगितली, “जर माझे चारित्र्य माझी स्वतःची ओळख देत नाही, की देव त्याच्यामध्ये आहे, तर (तो) त्याच्यावर विश्वास ठेवू नका.” आता त्याने असेही म्हटले की, तो त्यातून ओळखला जाईल. तर, ते, जर त्याची ओळख देत नाही, तर, तो, जे म्हणतो तो नाही.

113 आणि, आज, जर ख्रिस्त त्याची स्वतःची ओळख देत नाही. ख्रिस्ताचे स्वभाव वैशिष्ट्य आपल्याला ख्रिस्ताचे म्हणून ओळख देते. वचनावर विश्वास ठेवून...येशू वचन होता, म्हणून त्याला वचनावर विश्वास ठेवावा लागला. आणि आपण असे कसे म्हणू शकतो की, आपण ख्रिस्ताचे आहोत आणि बायबल कुठलेही वचन कसे नाकारु शकतो? ख्रिस्ताचा पवित्र आत्मा म्हणजे परमेश्वर तुमच्यात आहे आणि तो प्रत्येक अभिवचनास “आमेन” सह जोर देईल. बायबल म्हणते, “विश्वासणाऱ्याबरोबर ही चिन्हे असत जातील.” देवाचा आत्मा “आमेन” म्हणतो. समजले?

114 त्यांच्यातील एक असे म्हणू नका, “नाही, ते दुसऱ्या समयासाठी होते; ते फक्त शिष्यांसाठी होते.”

115 “सर्व जगात जाऊन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा. तो संपूर्ण जगात कोठेही असो. विश्वास धरणार्यांबरोबर ही चिन्हे असत जातील, तीच गोष्ट.” “तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे.” स्वभाव वैशिष्ट्ये ओळख देत होती.

116 तेच इब्री 1:1 सांगते, “देव प्राचीन काळी पूर्वजांशी संदेष्ट्यांद्वारे बोलत होता,” ख्रिस्ताची ओळख देत होता. त्याच्या त्याच स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे जी त्याने प्राचीन काळी केली, तो आज पुनरुत्थित झाला आहे. तुम्ही ह्याकडे लक्ष दिले काय? देव त्याचा मार्ग कधीच बदलत नाही.

117 जुन्या करारात, जेव्हा द्रष्टा स्वप्न पहात असे आणि तेथे त्या देशात एकही संदेष्टा नव्हता, हे सांगण्यासाठी की हे स्वप्न बरोबर आहे की नाही, त्यांच्याकडे हे शोधण्याचा दुसरा मार्ग होता. ते त्या व्यक्तीस, ज्याने स्वप्न पाहीले आहे, त्यास खाली मंदिरात नेत असत. अहरोनाचा उरपट जो मुख्य याजक होता, खांबावर टांगलेला असे. आणि हा द्रष्टा हे स्वप्न सांगेल, ते कितीही चांगले का भासेना, किती खरे का वाटेना, जर तेथे त्या खड्यांवर तो अद्भुत प्रकाश प्रकाशला नाही, ज्यास उरीम व थुम्मीम म्हटले आहे. (बायबल वाचकांना हे समजते) तर ते किती खरे वाटते याची मला पर्वा नाही. ते तसे नव्हते. देवाचे असामान्यत्व, देवाचे चारित्र्य, त्याचे स्वभाव वैशिष्ट्य अद्भूत रितीने प्रकट करतात, हे दाखवण्यासाठी तो त्याच्या संदेशाद्वारे स्वतःची ओळख देतो. आमेन.

118 मी आज रात्री तीच गोष्ट सांगतो, ते जूने उरीम थुम्मीम गेले आहे. परंतु वचन अजूनही अशी गोष्ट आहे, जे देवाच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख देते, ह्या समयाचे अभिवचन ज्यात आपण राहत आहोत, तेथे देवाची स्वभाव वैशिष्ट्ये आहेत, ज्यांची ओळख ह्या समयाच्या अभिवचनाद्वारे होते. ज्यात आपण राहत आहोत.

119 तीच गोष्ट देवाला सारखाच बनवते जो तो होता, “प्राचीन काळी”, पाहा, “प्रकाराप्रकारांनी” तो पूर्वजांशी संदेष्ट्याद्वारे बोलला. आणि योहानापर्यंत नियमशास्त्र आणि संदेष्टे होते; तेव्हापासून स्वर्गाच्या राज्याची. लक्ष द्या. “परंतु ह्या अंतिम दिवसात” तीच गोष्ट बोलत होता, जी त्याने तेव्हा केली. “त्याचा पुत्र ख्रिस्त येशूद्वारे. देव प्राचीन काळी अंशाअंशानी प्रकाराप्रकारांनी आपल्या पूर्वजांशी बोलला.” काळाच्या शेवटी तीच गोष्ट करीत आहे. “लोकांशी (पूर्वजांशी) त्याचा पुत्र ख्रिस्त येशूद्वारे बोलला.” त्याला मेलेल्यांतून उठवले आहे आणि तो आपल्यामध्ये राहत आहे. ह्यांचा परिक्षक आहे. येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. देव प्राचीन काळी अंशाअंशांनी आणि प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्याद्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला. परंतु काळाच्या शेवटी त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताद्वारे बोलला आहे. वचन बदलले जाऊ शकत नाही. हे बरोबर आहे.

120 जसे मी अगोदरच बोललो आहे, देवाला ह्या वचनाचा अनुवादकरण्यासाठी कोणाची गरज नाही. तो त्याच्या स्वतःच्या वचनाचा अनुवाद करतो. जेव्हा तो काही सांगतो, तेच घडते. तोच अर्थ आहे. समजले? त्याला कोणाची हे सांगण्यासाठी गरज नाही की, “मी विश्वास करतो, म्हणजे हे आहे.” देव त्याची ओळख त्याच्या स्वतःच्या अनुवादाद्वारे देतो. त्याच्या.

121 जर हे अभिवचन त्या दिवसासाठी आहे! आपण लूथरच्या—च्या—च्या प्रकाशात राहू शकत नाही. आपण वेस्लीच्या प्रकाशात राहू शकत नाही. आपण त्यांच्यातील कुणाच्याही प्रकाशात राहू शकत नाही. आपल्याला ह्या प्रकाशात राहिले पाहिजे, ज्या समयासाठी अभिवचन दिले आहे.

122 काय झाले असते, जर मोशे खाली मिसरात गेला असता, आणि म्हणाला असता. “बरे, आपण एक मोठे तारु बांधणार आहोत. आपण ह्या देशाच्या बाहेर तरंगत जाणार आहोत. नाईल नदी वर येणार आहे?” त्यांनी पुन्हा गुंडाळीत पाहिले, तेथे त्याचे अभिवचन दिले नव्हते. ते बरोबर आहे. परंतु, तुम्हाला माहित आहे, तो त्याला स्वतःला देवाचा संदेष्टा म्हणून समजत होता, कारण, तो जे बोले ते घडत असे, तेव्हा त्यांना समजत असे की, देवाचे वचन त्याच्याकडे होते. फारोकडे भाले होते, परंतु मोशेकडे वचन होते. म्हणून जेव्हा ते समुद्राकडे गेले, सर्व भाले समुद्राच्या खाली गेले आणि मोशेने इस्त्राएलाला समुद्रापलीकडे कोरड्या भूमिवर नेले; कारण, त्याच्याकडे वचन होते, आणि तो ह्या समयाचे वचन होता.

मोशे त्या समयासाठी प्रकट झालेले वचन होता. एलिया त्या समयासाठी प्रकट झालेले वचन होता.

123 ख्रिस्त प्रकट केलेले वचन आहे, आणि त्याने केलेली अभिवचने आहेत. आता थोडाच वेळ आहे आणि जग मला आणखी पाहणार नाही, पण तुम्ही मला पाहाल; पण तुम्ही मला पाहाल. “कारण मी जगाच्या अंतापर्यंत तुम्हांबरोबर असेन, तुम्हांमध्ये असेन. जी कामे मी करितो, ती तुम्ही सुध्दा कराल.” त्याने ह्या गोष्टीचे अभिवचन दिले आहे. ते काय आहे? हे देवाचे स्वभाव वैशिष्ट्य आहे, जे त्याचे वचन प्रकट करतात. जसे त्याने सर्व युगात केले आहे.

124 मलाखी 4 मध्ये, तो म्हणाला, “पाहा परमेश्वराचा मोठा व भयंकर दिवस येण्यापूर्वी मी एलिया संदेष्ट्यास तुम्हाकडे पाठवीन; आणि तो विश्वास उभारिल. वडिलांचे हृदय त्यांच्या पुत्रांकडे व पुत्रांचे हृदय त्यांच्या वडिलांकडे वळवील.” तो दिवस येण्यापूर्वी त्याने हे अभिवचन दिले आहे.

125 संत लूकच्या 17व्या अध्यायात येशू म्हणाला, “जसे सदोमाच्या दिवसात होते, तसे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळेस होईल, जेव्हा मनुष्याचा पुत्र प्रकट होईल.” जेव्हा प्रकटीकरण स्वतः प्रकट केले जाईल, त्या दिवसात जेव्हा जग सदोमासारखे होईल ते कसे असेल? त्या वचनाचे स्वभाव वैशिष्ट्य पूर्ण केले जाईल. देव त्याची स्वतःची ओळख त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे देतो. स्वभाव वैशिष्ट्ये जी त्याच्यामध्ये सदैव होती, तो ती सोडू शकत नाही.

126 काळाच्या शेवटी, त्याने त्याच्या पुत्राद्वारे ओळख दिली, पाहा देव कसा नेहमीच ह्या गोष्टी करतो...तो त्याचे मार्ग कधीच बदलत नाही.

127 हे तीन मनुष्य जे अब्राहामाशी बोलले; कारण आपण आताच तेथे सदोमाच्या दिवसाविषयी बोलत होतो.

128 अब्राहम एक असा मनुष्य होता, जो देवावर विश्वास ठेवित होता. त्याने देवाला त्याच्या अभिवचनाद्वारे घेतले. सारा, त्याची पत्नी, पासष्ट वर्षांची होती. अब्राहम पंच्याहत्तर वर्षांचा होता. जेव्हा देवाने त्याला बोलावले. तो म्हणाला त्यांना एक मुल होणार आहे. अब्राहामाला सारेद्वारे मुल होईल. ते कदाचित थोडे लज्जास्पद वाटेल. परंतु मला वाटते, तिच्याकडे सर्व लहान मोजे आणि पिन्स आणि सर्वकाही तयार होते, कारण त्यांना हे मुल होणार होते.

129 पहिल्या अठ्ठावीस दिवसानंतर, का, अब्राहामाने सारेला कदाचित विचारले असेल, “प्रिये, तुला कसे वाटत आहे.?”

“वेगळे वाटत नाही.”

“देवाला महिमा असो. आपल्याला कसेही करुन ते मिळणार आहे.”

“तुम्हाला कसे माहित?”

“देवाने तसे म्हटले आहे.”

एक वर्ष झाले, “प्रिये तुला कसे वाटत आहे?”

“वेगळे नाही.”

“आपल्याला ते कसेही मिळणार आहे. देव तसे बोलला आहे.”

पाच वर्षे झाली. “प्रिये तुला कसे वाटत आहे?”

“फरक नाही.”

“आपल्याला ते कसेही करुन मिळणार आहे. देवाने तसे सांगितले आहे.”

130 ते काय होते? त्याच्याकडे देवाचे अभिवचन होते, त्याने देवावर विश्वास ठेवला आणि तो देवासारखा वागला: त्याने प्रतिज्ञा दिलेले वचन पकडून ठेवले.

131 पंचवीस वर्षे झाली. मोजे पिवळे झाले, परंतु तिने त्यांना अजूनही सांभाळून ठेवले. आता तो म्हातारा झाला आहे. खांदे वाकले आहेत. त्याचा भयंकर आकार झाला आहे आणि सारेचा गर्भ मृत झाला आहे आणि तो वांझ आहे आणि ते कशा स्थितीत आहे!

132 “अब्राहाम, राष्ट्रांचा पित्या, तुला कसे वाटते?” त्यांचे ढोंगी विश्वासी मित्र त्याला म्हणत असत.

133 देवाचा गौरव होवो. हो, मला छान वाटत आहे. आम्हाला कसेही करुन मूल होणार आहे! कारण तो अविश्वासामुळे देवाच्या अभिवचनावर डळमळला नाही. परंतु तो सबळ

होऊन त्याने देवाचे गौरव केले. देव आपण दिलेले वचन पूर्ण करण्यास समर्थ आहे, अशी त्याची पूर्ण खातरी होती. आमेन. तेथे एका विश्वासणाऱ्याचे स्वभाव वैशिष्ट्य आहे.

134 तुमच्याविषयी काय? पाहा? आपल्याविषयी काय? जे अब्राहामाची लेकरे आहोत? काय आपण देवाच्या वचनाबरोबर अभिवचन म्हणून ओळखले जातो का? आणि आपले स्वभाव वैशिष्ट्य आपली ओळख देतात, की आपण वास्तवात त्यावर विश्वास ठेवतो? किंवा तुम्ही फक्त हेम–हॉ करता, *येथून* उड्या मारतात आणि *ह्याच्या* वर आणि *येथे* खाली आणि विचार करता आणि सभोवती हेम–हॉ ह्या विषयी तर आपण ख्रिस्ती नाही, आपण फक्त बनावटी विश्वास करतो.

135 परंतु, जेव्हा आपण खरेच, त्या अभिवचनावर उभे राहतो, तो घट्ट पकडतो आणि त्याबरोबर राहतो. जसे अब्राहामाने केले.

136 आता आपणाला आढळते, एके दिवशी तीन मनुष्य चालत येताना पाहिले, येथे बाईबल सांगते, "ती उन्हाची वेळ होती." दुपारची वेळ असेल. हे मनुष्य वर चालून आले आणि त्यांच्याशी बोलत होते. आपल्याला माहित आहे की, त्यातील दोघे सदोमात गेले. मला वाटते, आपण त्या रात्री ह्यावर बोललो आहे. त्यातील एक त्याच्या बरोबर राहिला.

137 ह्या मनुष्याकडे लक्ष द्या, ज्यास त्याने म्हटले…जो त्याच्या बरोबर राहिला, त्या मनुष्याने काय केले. एक जो त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे ओळखला गेला की, तो एलोहिम होता.

138 एलोहिम, बायबलमधील सर्वात पहिला शब्द, "प्रारंभी देव…" तुम्हा विद्वानातील कोणी जाणतो की, शब्द *देव* तेथे म्हणजे इब्री भाषेमध्ये "एलोहीम" ज्याचा अर्थ, "सर्वसमर्थ देव, सर्व पुरविणारा. स्वतःचे अस्तित्व असलेला," ज्यास कोणाच्या साहाय्याची गरज नाही. कोणाच्या अनुवादाची गरज नाही. तो स्वतः करतो तो सर्व परिपूर्ण परमेश्वर, सर्व साक्षी, सर्व ज्ञानी, सर्व व्यापी तो परमेश्वर आहे.

139 तेथे तो होता. आणि आता अब्रहामापुढे ज्याने वचन पकडले आहे ह्या पुरुषाकडे पाहता आणि जेव्हा त्या पुरुषाची पाठ डेऱ्याकडे वळवली, तो म्हणाला, "तुझी पत्नी सारा कोठे आहे?"

म्हणाला, "ती तुझ्यामागे डेऱ्यात आहे."

140 म्हणाला, "पुढच्या वसंत ऋतुत जीवनाच्या वेळेस मी तुजकडे खात्रीने परत येईन, आणि तुला मी अभिवचन दिल्यानुसार तुला मुल होईल."

141 आणि सारा हसली. आणि जो त्याच्याशी बोलत होता. त्याला म्हणाला की, सारा डेऱ्यात त्याच्यामागे काय म्हणाली,

142 आता, उत्पत्ती, तुम्ही ते वाचाल, तेव्हा आपल्याला समजते की, अब्राहाम या पुरुषाने त्याची ओळख दिल्यानंतर…

143 ते काय होते? इब्री 4था अध्याय, 12 वे वचन म्हणते, "देवाचे वचन सजीव, सक्रिय कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा यांना भेदून आरपार जाणारे आणि मनांतील विचार व हेतू ह्याचे परिक्षक असे आहे."

144 त्याला माहित होते की, हा तो पुरुष होता. त्याला माहित होते तेथे त्या देशात कोणी संदेष्टा नव्हता परंतु तोच, आणि म्हणून देवाचे वचन त्याच्याकडे आले होते आणि तो संदेष्टा होता आणि येथे वचन संदेष्ट्याकडे येते.

145 तिच गोष्ट बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाबरोबर होती. तेथे चारशे वर्षे संदेष्टा नव्हता. मला आठवते...

146 कदाचित वयस्कर डॉक्टर डेविस येथे आज रात्री बसलेले असतील, जुने मिशनरी, बाप्टिस्ट प्रचारक ज्यांनी मला ह्या विश्वासात बाप्तिस्मा दिला, ते माझ्याबरोबर वादावादी करत असत. ते म्हणत, “बिली, तू आता एक लहान मुलगा आहेस, तुला माझे ऐकले पाहिजे.”

मी म्हणत असे, “ठीक आहे, भाऊ डेविस, मी ऐकत आहे.”

147 ते म्हणाले, “तुला माहित आहे, योहानाचा बाप्तिस्मा झाला नव्हता. परंतु तो बाप्तिस्मा देत होता, परंतु त्यांना बाप्तिस्मा दिला नव्हता. त्याला बाप्तिस्मा देण्यास कोणी समर्थ नव्हता.” ते बाप्टिस्ट देवविषयक शास्त्र आहे. “आणि येथे येशू आला आणि तेव्हा म्हणला...योहान म्हणाला ‘मला तुमच्याकडून बाप्तिस्मा घेण्याची गरज आहे. तुम्ही माझ्याकडे का आला आहात?’ आणि तो म्हणाला ‘आता हे होऊ दे.’” आणि तो म्हणाला, “आणि तेव्हा त्याने ‘तसे होऊ दिले,’” म्हणाला “तुम्ही पाहीले, तेव्हा येशूने योहानास बाप्तिस्मा दिला आणि मग बाप्तिस्मा घेतल्यावर तो पाण्यातून बाहेर आल्यावर, आकाश उघडले आणि तेव्हा त्याने देवाला कबूतराच्या रुपात खाली उतरताना आणि आपणावर येताना पाहीले, म्हणाला ‘हा माझा पुत्र, मला परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.’” परंतु नाही, डॉक्टर डेविस बरोबर असहमत झालो नाही, परंतु ते चुकीचे होते.

148 पाहा, योहान संदेष्टा होता. आणि वचन सदैव संदेष्ट्याकडे येते. म्हणून जर वचन देहधारी झाले, त्या संदेष्ट्याकडे कसे करुन; यावे लागले. कारण, तो वचनाविषयी साक्ष देत होता, आणि त्याचे ते स्वभाव वैशिष्ट्य त्याची ओळख देत होते. येथे वचन येते, आता काय घडले? जसे तो चालत येशूकडे गेला “आपल्या हातून मी बाप्तिस्मा घ्यावा असे असता आपण माझ्याकडे येता हे काय?”

149 येशू म्हणाला, “आता हे होऊ दे. कारण ह्याप्रकारे सर्व धर्माचरण पूर्णपणे करणे हे (आपणाला उचित) आहे.” योहान संदेष्टा असल्याने; तो वचन असल्याने तो अर्पण होता आणि तो त्याच्या पृथ्वीवरील सेवकाईत प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत होता, आणि अर्पण सादर करण्याआधी धुतले पाहिजे आणि योहानाने त्याला बाप्तिस्मा दिला. कारण त्याला माहित होते, “आता हे होऊ दे कारण ह्या प्रकारे सर्व धर्माचरण पूर्णपणे करणे हे आपणाला उचित आहे.” अर्पण सादर करण्याआधी धुतले पाहिजे. आणि म्हणून योहानाने त्याला बाप्तिस्मा दिला. तेथे येशूने योहानाला बाप्तिस्मा दिला नाही. योहानाने येशूला बाप्तिस्मा दिला. “आता हे होऊ दे.”

150 लक्ष द्या, येथे अब्राहाम होता आणि त्याच्याकडे प्रभूचे वचन होते. आणि त्याच्याकडे प्रभूचे वचन आले. तो एक संदेष्टा होता आणि आता येथे वचन आले. त्याने त्यास “अब्राहाम” म्हटले, *अब्राम* नाही.

151 त्याच्या काही दिवस अगोदर त्याचे नाव अब्राम—अब्राम होते, आता ते “अब्राहाम” आहे. त्याची पत्नी सारी होती. आता ती “सारा” आहे. साराय नाही; सारा. अब्राम नाही, (अब्राहाम) परंतु अब्राहाम, अब्राहाम.

152 आणि ह्या पुरुषाने त्याची स्वतःची ओळख दिली, जेव्हा तो स्वतः म्हणाला, अब्रहामा!, ओह माझ्या देवा!

अब्राहाम म्हणाला, “एलोहीम!”

153 तेथे वचन आणि संदेष्टा, एकत्र होता, दोन्ही व्यक्ती ओळख देतात.

154 एलोहीम, तो म्हणाला, “तुझी बायको सारा कोठे आहे?”

155 म्हटले, ती तुझ्यामागे डेऱ्यात आहे आणि…तेव्हा अद्भूत घडले. एलोहीम! अब्रहामाने त्याला म्हटले, “सर्व पुरविणारा, सर्व समर्थ, सर्व व्यापी परमेश्वर.”

156 येशूने म्हटले, जेव्हा तो पृथ्वीवर होता, त्याने त्याच गोष्टी केल्या. ज्या एलोहीमने केल्या. त्याने देव म्हणून त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख दिली.

157 आणि तो म्हणाला, आधी, “शेवटच्या दिवसांत, मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळेस, जेव्हा तो प्रकट केला जाईल ह्या गोष्टी पुन्हा घडतील, जशा त्या सदोमात होत्या.” त्याच्या लोकांत एलोहीम सर्वसमर्थ परमेश्वर! हेच पवित्रशास्त्र सांगते. एलोहीम त्या लोकात.

158 चाळीस वर्षे तो पवित्र आत्म्याने आपला बाप्तिस्मा करीत होता. एलोहीम परमेश्वर! आणि मंडळी…

159 पाहा, अब्रहामाने एक चिन्ह पाहिले, दूसरे बोलावणे; एक चिन्ह, एक बोलावणे, एक बोलावणे, एक चिन्ह; त्या अभिवचनाच्या संतानाची वाट पाहत होता. परंतु शेवटचे चिन्ह जे त्याने पाहीले, ते शेवटचे येणे. देवाची शेवटची भेट. तो अभिवचनाचा पुत्र दृश्यांत येण्याअगोदर, तो एलोहीम मनुष्य देहात आला ही होती. नंतर अभिवचनाचा पुत्र आला.

160 आणि अब्राहामाची संतती त्या अभिवचनाच्या पुत्राची, येशू ख्रिस्ताची, वाट पाहत होती आणि त्यांनी चिन्हे बघितली, पवित्र आत्म्याचा वर्षाव, निरनिराळ्या भाषा बोलणे, दैवी आरोग्य आणि अशी अनेक. परंतु जेव्हा मनुष्याचा पुत्र प्रकट केला गेला. एलोहीम अब्रहामाच्या राजकीय वंशात पुन्हा परत येईल आणि त्याच्या गोष्टी दाखवील ज्या त्याने त्या दिवसात दाखवल्या, आमेन. एलोहीम, जसा तो होता! का? ते देवाचे स्वभाव वैशिष्ट असतील.

161 आता, जर ख्रिस्त देव होता. आणखी थोडा वेळ आणि जग मला आणखी पाहणार नाही; तर तुम्ही मला पाहाल, कारण मी तुम्हाबरोबर असेन तुमच्यामध्ये जगाच्या अंतापर्यंत जी कृत्ये मी करतो तुम्ही सुध्दा कराल.

162 येशूने ते लूक 17व्या अध्यायात म्हटले, ठीक आहे. जेव्हा आपण विश्वास ठेवतो आणि ह्या शेवटच्या दिवसात पाहतो, त्या गोष्टी पुन्हा घडतील.

163 म्हणून, इब्री 1:1 “देवाने प्राचीन काळी संदेष्ट्याद्वारे त्यांची ओळख दिली. ह्या काळच्या शेवटी त्याचा पुत्र मरणातून पुनरुत्थित झाल्याद्वारे दिली,” मंडळीत तीच स्वभाव वैशिष्ट्ये देऊन जी त्याच्यामध्ये होती इब्री 13:8 तसेच्या तसे खरे केले.

164 त्यांतून काहीच बाहेर काढता येणार नाही. ते गरुडाचे पंख आहेत. ते घट्ट राहतात कारण, ते स्वर्गीय पक्षी आहेत. [टेपवर रिकामी जागा—संपा.]…ते त्यांना गरुडाचे अन्न खाण्यास देतात.

165 आता आपण पहातो की, “प्राचीन काळी प्रकाराप्रकाराने तो, पूर्वजांशी संदेष्ट्याद्वारे बोलला. ह्या शेवटच्या काळात त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताद्वारे बोलला. त्याला मरणातून उठविण्याद्वारे.” आणि येथे तो आपल्यामध्ये दोन हजार वर्षांनंतर आहे. तोच येशू संदेष्ट्यांमधील एक नाही. येशू, हालेलुयाह, देवाचा पुनरुत्थित पुत्र!

166 येशू एके दिवशी म्हणाला, “ही कुटील व्यभिचारी पीढी चिन्ह मागते आणि त्यांना चिन्ह मिळेल.” कुटील आणि व्यभिचारी पीढी. हे जग केव्हा तरी कुटील किंवा व्यभिचारी आणि विकृत होते का, जेवढे आता आहे?

167 “जसे योनाच्या दिवसात होते, योना माशाच्या पोटात तीन दिवस आणि रात्र होता; तसेच मनुष्याचा पुत्र पृथ्वीच्या गर्भात तीन दिवस आणि रात्र असेल!”

168 तेव्हा, “कुटील आणि व्यभिचारी पीढीला” चिन्ह मिळणार होते. कशा प्रकारचे चिन्ह? पुनरुत्थानाचे चिन्ह आणि आपल्याकडे ते आज दोन हजार वर्षानंतर आहे, तो आजही जीवंत आहे, तो ह्या रात्री आपल्यामध्ये आहे, तोच काल, आज आणि युगानुयुग, देवाच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे स्वतःची ओळख देत आहे. वचन ह्या दिवसात प्रकट करीत आहे. जे करण्याचे त्याने अभिवचन दिले होते. आमेन.

169 तेथे वचन आहे. आता तुम्ही चिन्हावर विश्वास ठेवाल काय? पुढची गोष्ट काळाच्या शेवटी, तो त्यांच्या पुत्राद्वारे प्रकट होईल? लक्ष द्या.

170 देव प्राचीन काळी मोशेशी बोलला. अनुवाद 18:15 म्हणाला, “प्रभू तुझा परमेश्वर माझ्यासारखा संदेष्टा उदयास आणिल” आता लक्ष द्या. ते वचन आहे. ते वचन आहे. तो देव होता. तो मोशे नव्हता, मोशेला कसे कळले असते की, तो एक मनुष्य आहे? परंतु देव मोशेद्वारे बोलत होता. हे बोलला, तुम्ही ते विश्वास करता का? ठीक आहे.

171 आता येशूला पाहा, लक्ष द्या, कसे त्याचे स्वभाव वैशिष्ट्य हे अभिवचन दिलेले वचन खरे आहे. ह्याची ओळख देत होता. त्याने निश्चितच केले. तो ह्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे ओळखला गेला, जे मोशे म्हणाला, तो असेल.

172 त्यांच्यातील कित्येक, आजच्या सारखे, ते काही महान नेत्यांना पाहू इच्छित होते. “ओह, हे डॉक्टर पी. एच. *अमुक–आणि–अमुक*. तो हार्टफोर्ड विद्यापिठाच्या बाहेर होता किंवा तो अशा महान मोठ्या कुठल्यातरी गोष्टीच्या बाहेर होता” ती देवाची ओळख नाही.नाही. ह्याविषयी एकही गोष्ट नाही. वचनच आहे, जे देवाची ओळख देते. समजले?

173 येशू जगासाठी कोणी विद्वान नव्हता. तो कोणी याजक नव्हता. तो कोणी रब्बीही नव्हता. तो जगासाठी एक विरोधक होता.

174 परंतु देव त्याचे वचन त्याच्याद्वारे प्रस्थापित करीत होता, ज्याने त्याला इम्मानुएल केले. ती त्याची ओळख होती. आता, येथे येशू अगदी तेच करीत होता. जे देवाने प्राचीन काळी म्हटले होते की तो करील, मोशेद्वारे तो काय करील.

175 आता लक्ष द्या, जेव्हा तो पेत्राला भेटला, जसे आपण दुसऱ्या रात्री नाट्यांतून दाखवले, जेव्हा तो पेत्राला भेटला आणि पेत्राला त्याचे नाव काय होते हे सांगितले. हे चिन्ह त्याच्या मसीही दाव्याची ओळख पेत्राला देत होते, कारण वचनात म्हटले होते, “प्रभू परमेश्वर एक संदेष्टा उभा करील.”

176 आणि पेत्र आला, जो तेव्हा शिमोन होता, वर आला जेथे तो होता आणि येशूने त्याच्याकडे पाहीले. म्हणाला, “तुझे नाव शिमोन आहे आणि तू योनाचा पुत्र आहे.” ते ख्रिस्ताच्या स्वभाव वैशिष्ट्याची त्या वचनाची जे मोशेने दिले होते ओळख देत होते. पेत्राने ओळखले की ते चिन्ह येशूची मसिहा म्हणून ओळख देत होते. “देव ख्रिस्तामध्ये होता.” अंतिम दिवसांसाठी अभिषेक करीत होता. नथनेलाला…आठवण ठेवा त्याने शिमोनाला त्याचे नाव सांगितले होते.

177 आता, लक्ष द्या, नथनेलाला त्याने काय केले हे सांगितले, “तू झाडाच्या खाली होतास. तेव्हा मी तुला पाहीले.” त्यावरुन त्याची मसीहा म्हणून ओळख झाली.

178 म्हणाला, “तुम्ही देवाचे पुत्र आहा, तुम्ही इस्त्राएलाचे राजे आहात.” त्याच्या अभिवचन दिलेल्या वचनाच्या स्वभाव वैशिष्ट्याद्वारे तो मसिहा होता, ओळखला गेला. “प्रभू परमेश्वर एक संदेष्टा उभा करील.”

179 ती विहीरीजवळील लहानशी स्त्री, त्याने तिला ती कोण होती हे सांगितले आणि त्यावरुन तिने त्याला तो येणारा मसीहा आहे हे ओळखले. समजले?

180 त्याचे चारित्र्य, त्याचे स्वभाव वैशिष्ट्य वचन त्याची ओळख देत होते, त्याचे स्वभाव वैशिष्ट्य हे दाखवत होते की, वचन देव होता, म्हणून देव ख्रिस्तामध्येच ओळख देत होता. आता ह्याकडे लक्ष द्या. नोंद घ्या.

181 पेत्राला, त्याने पेत्राला त्याचे नाव पुकारण्याद्वारे ओळख दिली. त्याने नथनेलाला, ओळख, त्याने काय केले हे सांगण्याद्वारे दिली. स्त्रीने त्याला ओळखले, जेव्हा त्याने ती कोण होती हे सांगितले, तो काय...*तो* कोण होता; *त्याने* काय केले; आणि *ती* काय होती. त्याने त्याच्या मसीहाच्या स्वभाव वैशिष्ट्यांची ओळख दिली की, तो मसीहाची स्वभाव वैशिष्ट्ये होती.

182 त्या लहान स्त्रीकडे पाहा, जिने तिच गोष्ट सांगितली, “महाराज आपण संदेष्टे आहात, आपल्याकडे शेकडो वर्षापासून संदेष्टा नाही. आपल्याकडे खूप चर्च आहेत, पुष्कळ गोंधळ आहेत आणि संप्रदायात मतभेद आहेत, परंतु आपल्याकडे शेकडो वर्षांपासून संदेष्टा नाही. आम्हांला ठाऊक आहे की, जेव्हा मसीहा येईल ह्या गोष्टी त्याची ओळख देतील.”

183 तो म्हणाला, “जो तुझ्याबरोबर बोलत आहे. तो मी तोच आहे.” ह्यात काही संशय नाही. “मी तो आहे.” ह्याने त्याची ओळख दिली.

184 रक्तस्त्रावी स्त्रीने ओळखले की तो वचन आहे. कसे? त्याने जे केले, जेव्हा तिच्या विश्वासाने त्याला स्पर्श केला. तो वळला आणि म्हणाला, “मला कोणी स्पर्श केला?” त्याला कळले काहीतरी घडले. त्या गोष्टीने येशू मसीहा असल्याची ओळख दिली.

185 तिने त्याच्यावर विश्वास ठेवला आणि ती म्हणाली, जर मी त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला शिवले, मी बरी होईन.

186 म्हणून जसे तिने शिवले, तो वळून म्हणाला, “आता कोणी मला स्पर्श केला?” आणि ते सर्व नाही म्हणाले, परंतु त्याचे मसीहाचे स्वभाव वैशिष्ट्य...

187 आमेन! मी आशा करतो की, तुम्ही समजत आहात, मंडळी. लक्षपूर्वक ऐका कारण आपण बंद करत आहोत.

188 तेथे तिने त्याला शिवले. तेथे कदाचित शेकडो असतील, जे त्याला शिवण्याचा प्रयत्न करीत होते. पेत्राने नाकारुन त्याला म्हटले. “बरे, त्यांच्यातील सर्वच तुम्हाला स्पर्श करीत आहेत.”

189 तो म्हणाला, “होय, परंतु कोणीतरी मला वेगळ्या रितीने स्पर्श केलाच.” ते वेगळे होते. त्याच्या विश्वासाने स्पर्श केला. समजले? म्हणाला, “कोणीतरी मला स्पर्श केलाच. तो वेगळा स्पर्श होता. मी अशक्त झालो. माझ्यातून शक्ति निघाली.” आता तेथे तो उभा आहे.

190 आता, त्याचे स्वतःचे शिष्य देखिल बोलत होते. दूसऱ्या शब्दांत “तू असा दिसतो जणू काही तू कोणी वेडा व्यक्ती होता. का लोकं, सर्व तुला स्पर्श करीत आहे.”

191 त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याकडे आता लक्ष द्या. त्याने वळून लोकसमुदायात पाहिले. त्याने तिला अचूक ओळखले. ती आणखी स्वतःला लपवू शकली नाही. त्याने तिची

अवस्था तिला सांगितली आणि म्हणाला. “तिच्या विश्वासाने तिला बरे केले आहे.” तिला त्याद्वारे कळले.

192 ते इब्री 4:12 “वचन मनातील विचार व हेतू ह्यांचे परिक्षक आहे.” त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यांनी त्याची ओळख ही की, “देवाचा शब्द जो देही झाला आणि आमच्यामध्ये वस्ती केली.” आमेन.

193 मला वाटते तीच गोष्ट आज रात्री ओळख देते. पुनरुत्थित येशू ख्रिस्त आज रात्री आमच्यामध्ये राहत आहे. काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे. आता, जसे इब्री 13:8 हे खरे आहे. त्याचे चारित्र्य आज त्याची ओळख देईल. जशी तेव्हा दिली. त्याचप्रकारे

194 क्लयपा आणि त्यांच्याकडे पाहा. पुनरुत्थानानंतर येशूने त्याची स्वतःची ह्याप्रकारे ओळख दिली, त्याने ती भाकरी मोडली. त्याने अगदी तशाच प्रकारे केले. जसे त्याने वधस्तंभावर जाण्याआधी केले. आणि ते...त्याच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख देते. कारण तशाच प्रकारे त्याने ते केले.

195 आता जर तो येथे आज रात्री असता. तो त्याची ओळख कशी देईल? तशाच प्रकारे जशी त्याने काल दिली. कारण तो आजही सारखाच आहे आणि युगानुयुग सारखा असेल. हीच ओळख आहे. इब्री. 4:14 आणि 15 “तो आता...” ते म्हणते, “तो आपला प्रमुख याजक आहे. ज्यास आपल्या दुर्बलतेविषयी सहानुभुती आहे.” तो आता आपला प्रमुख याजक आहे. त्याच्या पुनरुत्थानानंतर, त्याच्या मृत्युनंतर, त्याच्या दफनानंतर, त्याच्या पुनरुत्थानानंतर त्याचे स्वर्गरोहन झाल्यानंतर, आमेन. तो अजूनही काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे, एक प्रमुख याजक ज्यास आपल्या दुर्बलतेविषयी सहानुभूती आहे. आमेन. तो आताही येथील विश्वास करतील त्या पुरुष आणि स्त्रीयांना सारखाच आहे. तो आपला प्रमुख याजक आहे. काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे.

196 तो युगानुयुग जीवंत आहे. तुम्ही ह्यावर विश्वास करता का? [मंडळी म्हणते, “आमेन.”] त्याचे स्वभाव वैशिष्ट्य सतत त्याची तो सारखाच असल्याची ओळख देतात. जसा तो होता, जेव्हा तो ह्या पृथ्वीवर होता. तो अजूनही येथे आज रात्री, पवित्र आत्म्याच्या रुपात रहात आहे. तो सदैव जीवंत आहे आणि त्याचे स्वभाव वैशिष्ट्य तो आपल्यातून दाखवतो. जसे तो नेहमी असत आला, तसेच तो अजूनही जीवंत असतानाही.

197 मी आज रात्री आभारी आहे की, “देव प्राचीन काळी प्रकाराप्रकारांनी पूर्वजांशी संदेष्ट्यांद्वारे बोलला. ह्या काळाच्या शेवटी त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताद्वारे बोलला.”

198 ओह, मला कळले नाही, की इतका वेळ बोललो, मी ते तसे आहे. हे विसरलो. मला क्षमा करा...मी थांबवीन.

आपण प्रार्थना करुया.

199 स्वर्गीय पित्या, महान दयाळू परमेश्वरा! प्रभू मी—मी...कदाचित खूप बोलतो. मी प्रार्थना करितो, देवा, जर मी बोललो, तू मला क्षमा कर. परंतु, प्रभो, मी जे बोललो त्यासाठी क्षमा मागू शकत नाही. मी तेच बोललो आहे, जे तू येथे तुझ्या वचनात सांगितले आहे.

200 आता फक्त एक किंवा दोन वचने तुझ्याकडून प्रभो, जी प्रत्येक जण येथे आज रात्री पाहतील. लहान, आजारी लोक बरे होतील. जेव्हा ते पाहतील की, तू अजूनही आमचा महान प्रमुख याजक आहेस. प्रभो, मी प्रार्थना करितो की, ह्या पुढील काही मिनिटात, तू हा संदेश वास्तवात पुन्हा जीवंत करशील. जे मी वचनाद्वारे सांगितले, आज रात्री तुझे

स्वभाव वैशिष्ट्य आमच्यामध्ये तुझी ओळख देवो की, तू काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. कारण आम्ही हे येशूच्या नावाने मागतो. आमेन.

201 फक्त काही क्षण आता, आपण मला—मला—थोडा उशीर झाला आहे. परंतु तुम्ही थोडा वेळ एक लहान प्रार्थना पंधरा वीस मिनिटासाठी करण्याकरिता सहन कराल का? जर तुम्ही कराल, तर तुमचे हात वर पकडा, म्हणा, "आम्ही…" ठीक आहे. आभारी—तुमचा आभारी आहे. मी तुम्हाला साडे नऊ वाजता सोडण्याचे वचन दिले. आता ती वेळ झाली आहे. अजून वीस मिनिटे आहेत. म्हणून जर तुम्ही मला फक्त दहा मिनिटे द्याल. मी घाई करीन.

202 आपण पाहूया, किती प्रार्थना पत्रके त्यांनी आज बाहेर दिली आहेत? [एक भाऊ म्हणाला, "ओ."—संपा.] ओ? आपण त्या रात्री कुठून सुरुवात केली होती, एक? ["मला वाटते तो एक होता"] होय.

203 आणि तेव्हा आपण, काल रात्री, आपण फक्त…पवित्र आत्मा…मी आज ऐकत होतो, आणि जे सांगितले त्याची पुनरावृत्ती करीत होतो.त्यांतील काही फ्रेंच नावे, मी…पवित्र आत्मा, केवळ त्याच प्रकारे मी ते करु शकतो, जरा थांबा आणि पाहा.

204 पाहा, कधीकधी तुम्ही दृष्टांत पाहता. तो तपासून पारखून आणि भाषांतर करावे लागते. त्याचा अनुवाद केला आहे. एक दृष्टांत, जसे तुम्ही एक मेंढी बघितली, त्याचा अर्थ लोकर असू शकेल. पाहा, तुम्हाला त्याचे भाषांतर करावे लागते. समजले. आणि तो दृष्टांत तपासून व पारखून भाषांतर करावे लागते.

205 आणि मी काल रात्री पाहिले, मी–मी ती फ्रेंच नावे उच्चारु शकलो नाही, मला ती लिहावी लागली.

206 आफ्रिकेत आणि त्या एका आफ्रिकेतील जंगली अशिक्षीत जमात इतर मुर्तिपूजक, आणि गोष्टी, त्यांची नावे लिहावी लागतात. त्यांना सांगावे लागते ते कोण होते. त्यांच्या भाषेत शब्द लेखन करावे लागते. त्यांना ते काय होते ते समजेल, ज्यावेळी तुम्ही त्याचे शब्दलेखन करता. परंतु, पाहा, परंतु त्याला सगळ्या भाषा ठाऊक आहेत. तो सार्वकालिक परमेश्वर आहे.

207 आज रात्री आपण ओ मधील पंचाहत्तर पासून ते शंभर पर्यंत सुरुवात करुया. ओ ना, तेच तो म्हणाला ना? मी…[एक भाऊ म्हणतो "होय ओ."—संपा.] ओ, ओ. होय ठीक आहे. कोणाकडे प्रार्थनापत्र पंचाहत्तर आहे. आपण ते पाहूया. ओ मध्ये प्रार्थना पत्रक ओ पंचाहत्तर ज्या कोणाकडे ते आहे, तुमचा हात वर करा. ओ ठीक आहे. *येथे* या. पंचाहत्तर, ऐंशी, पंच्याऐंशी, नव्वद, पंचाण्णव, शंभर जर तुमच्याकडे असेल *ह्या* मार्गाने या. ठीक आहे. येथपर्यंत रांग करा. लवकर, कारण आपल्याकडे वेळ नाही. मी विश्वास करतो की, तुम्ही ते कराल.

208 तुमच्या प्रार्थना पत्राकडे पाहा. तुमच्या शेजाऱ्याच्या प्रार्थना पत्राकडे पाहा…आणि जर कोणी पांगळा असेल त्यांना थेट प्रार्थना रांगेत आणा. म्हणून जर त्याच्याकडे ओ, फक्त ओ असेल,…,

209 पंचाहत्तर ते शंभर *येथपर्यंत* रांग करा. जर तुमच्याकडे असेल, तुम्ही जेथे कोठे असाल, बालकनीत, कोठेही असाल, थेट खाली या आणि लवकरात लवकर रांगेत या. जर तुम्ही याल, यासाठी की वेळ वाचावा.

210 आता, येथे तुम्ही उरलेले, ज्यांच्याकडे प्रार्थनापत्र नाही. तुम्ही तुमचे हात वर करा आणि म्हणा, "भाऊ ब्रॅन्हम, माझ्याकडे प्रार्थना पत्र नाही. परंतु मी विश्वास करतो?" तुमचे हात वर करा.

211 आता लक्ष द्या, मी तुमच्याशी प्रमुख याजकाविषयी बोलणार आहे. "तो प्रमुख याजक आहे. ज्यास आपल्या दुर्बलतेविषयी सहानुभूती आहे." तो "*यहोवा यिरे*" प्रभूचे पुरविलेले अर्पण. तो "*यहोवा राफा*" प्रभू जो तुझे सर्व रोग बरे करतो. तुम्ही विश्वास करता का? [मंडळी म्हणते "आमेन."—संपा.] तो यहोवा मनश्शे आहे. *ढाल* आमची *शांती* आहे. तो अजूनही आहे. ठीक आहे. किती जण विश्वास करतात. की ते सर्व मुक्तीची यहोवाची नावे येशूला लागू होतात. ["आमेन."—संपा.] निश्चितच त्याला लागू होतात...का, ते वेगळे करु शकत नाही. म्हणून त्याच्याकडे ते सर्व असले पाहिजे आणि जर तो अजूनही 'यहोवा यिरे, तो यहोवा–राफा आहे. जर तो *यहोवा–यिरे*...तो यहोवा–यिरे, म्हणजे "प्रभूचे मुक्तीसाठी पुरविलेले अर्पण" आहे, तेव्हा तो *यहोवा–राफा* तो "आपले सर्व रोग बरे करतो." आमेन. आरोग्य फक्त देवाकडून येते.

212 ठीक आहे, जेव्हा लोक रांगा करीत आहेत; माझ्याकडे हे पाहण्यासाठी वेळ नाही की ते कोण आहेत आणि ते काय आहेत. परंतु आता तेथे बाहेर असणारे सर्व जाणतात की, मी तुम्हाला ओळखीत नाही. तुमचे हात वर करा. म्हणा, "मला देवाची गरज आहे. परंतु भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही मला ओळखीत नाही. परंतु मला देवाची गरज आहे. मी फक्त माझा हात वर करीत आहे."

213 आता जर तुम्ही काही मिनिटांसाठी स्थिर व्हाल, लक्ष द्या सावध असा, शांत व्हा, आता माझा अर्थ असा नाही, जेव्हा मी म्हणतो, "शांत व्हा,"...जर प्रभू काही करतो. तुम्हाला प्रभूची स्तुती करायची असेल, ती आराधना आहे. परंतु मला सांगायचे आहे, "फक्त सभोवती धावणे, उभे राहणे," तुम्हाला ठाऊक आहे, ते अनादरशील आहे. समजले? आणि पवित्र आत्मा खूप भयपूर्ण, खूप भयपूर्ण आहे. समजले? त्यासारखे काही मला दूर करते आणि मला तेव्हा युध्द पुन्हा करावे लागते, समजले? परंत जर तुम्ही लक्ष द्याल!

214 तुम्हाला त्याचे पहिले अभिवचन आठवते का? "लोकांना तुझ्या विश्वासात आण आणि मग प्रामाणिक राहा. प्रार्थनेसमोर काहीच उभे राहणार नाही." तुम्हाला ते लक्षात आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] ते खरे आहे आणि ते आहे...मी ते पडताना अजून कधी पाहीले नाही, आणि ते कधीच पडणार नाही. तो देव आहे.

215 आता आपण प्रार्थना रांगेत घाई करुया, ह्यासाठी की आपण शक्य होतील तितके जण घेऊया, लोकांकरिता. परंतु, तुम्ही ज्यांच्याकडे प्रार्थना पत्रे आहेत आणि आज रात्री, बोलावले गेले नाही. तुमचे पत्र पकडून धरा, आम्ही तुमच्याकडे येणार आहोत. ठीक आहे.

216 आता, तुम्ही जे बाहेर प्रार्थना पत्रांशिवाय आहेत लक्ष द्या किंवा तुम्ही तेथे बाहेर असलेले तुमच्याकडे प्रार्थना पत्रे आहेत किंवा नाहीत, फक्त विश्वास करा की, तो इब्री 4थ्या अध्यायासारखा येथे आहे. "तो प्रमुख याजक आहे ज्यास आपल्या दुर्बलतेविषयी सहानुभूती आहे." पाहा की, तो तोच आहे. पाहा की यहोवाने त्याला त्याच्या लोकांमध्ये, दर्शविले आहे. जसे त्याने सदोमाच्या दिवसात केले. ठीक आहे.

217 ठीक आहे, महाशय. आता आपण प्रार्थना करुया. खऱ्या आदराने येऊया. आता लक्ष द्या. देवाकडील एक शब्दही कोणाच्या बोलण्यापेक्षा अधिक आहे. आता हा मनुष्य येथे मी त्याला ओळखीत नाही आणि मला वाटते तो...तू माझ्यासाठी अनोळखी आहे, तू आहेस

का महाशय? [भाऊ म्हणतो, "होय"—संपा.] तू अनोळखी आहेस. आपल्याला एक गोष्ट माहीत आहे की, आपल्याला दोघांना एके दिवशी देवाच्या उपस्थितीत उभे राहायचे आहे. मनुष्य म्हणून आपल्याला तेथे भेटायचे आहे. ही आपली पहिलीच भेट आहे.

218 आता जर तू येथे आला आहेस, जर तू आजारी आहेस, मला ठाऊक नाही, ते कदाचित दुसरे काही असेल, पाहा, परंतु जर मी—जर मी, हात तुझ्यावर ठेवून म्हणालो, "प्रभूची स्तुती असो. जा बरा हो." ते ठीक आहे. तू त्यावर विश्वास ठेवू शकतो. परंतु काय जर त्याने तुला तुझ्याबरोबर काय झाले आहे ते सांगितले? आता बघ, ती वेगळी गोष्ट आहे, तर तुला माहीत आहे की ते त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यांची ओळख देते. पाहा, ते माझे स्वभाव वैशिष्ट्य नसणार मी एक मनुष्य आहे. मला त्याच्याविषयी काहीच कळणार नाही. मी त्याला म्हणालो, "मी तुला ओळखत नाही." तो मला ओळखत नाही. परंतु त्याने काय होईल? ते येशू ख्रिस्ताच्या स्वभाव वैशिष्ट्याची ओळख देते. जो काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. समजून की तो मी असू शकत नाही, मी असू शकत नाही, कारण मी त्या मनुष्यास ओळखत नाही. मी माझे हात उंच करतो; *येथे* वचन आहे. समजले? मी त्याला ओळखत नाही, तो मला ओळखत नाही. परंतु येशू ख्रिस्ताचे स्वभाव वैशिष्ट्य...

219 जर येशू येथे उभा असता; आणि तो आजारी आहे. जर तो म्हणेल, "प्रभू येशू, मला बरे कर." येशूने त्याला काय म्हटले असते? "मी ते अगोदरच केले आहे." ते बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.]

220 "तो आपल्या दुष्कर्मासाठी ठेचला गेला; त्यास बसलेल्या फटक्याने आम्हास आरोग्य प्राप्त झाले आहे." सर्व मुक्ती जी आपण प्राप्त करू शकतो, ती कालवरीवर पूर्ण झाली. तेथून तो विश्वास आहे. त्याने पूर्ण केलेल्या कामावर विश्वास ठेवणे. हे बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन"—संपा.] ठीक आहे.

221 आता जर येशू जीवंत आहे, आणि मी त्याच्या वचनाविषयी बोललो आहे...तेथे तुम्ही आहात, त्या साधेपणाकडे आणि विश्वासाकडे परत या. त्याच्या वचनावर विश्वास ठेवून, जेव्हा तो मला त्या रात्री भेटला, तो म्हणाला "तुला कळेल की, तुला त्यांच्या हृदयातील रहस्येदेखील कळतील. ते जर हाताच्या पहिल्या चिन्हावर विश्वास ठेवणार नाही, त्यांना ह्यावर विश्वास ठेवावा लागेल. समजले? ते त्यांनी केले नाही, तर रक्त पृथ्वीला शापित करील." जसे ते मोशेच्या काळात झाले.

222 जसे ते मोशेच्या काळात झाले. म्हणाला, "जर त्यांनी ह्या दोन्ही चिन्हांवर विश्वास ठेवला नाही. तर रक्त पृथ्वीवर ओत. पाहा, पाणी पृथ्वीवर ओत, ते रक्त होईल."

223 आता फक्त हे पाहण्यासाठी. जर मी तुझी समस्या काय आहे हे समजू शकलो, तर ते तुझे समाधान करील आणि तुला विश्वास ठेवण्यास लावील, लावील की नाही. [भाऊ म्हणतो, "खात्रीने."—संपा.] तुम्हाला ठाऊक आहे. हे त्या व्यक्तीचे येशू ख्रिस्ताचे स्वभाववैशिष्ट्य आहे. ज्याविषयी मी बोलत आहे.

224 तो मनुष्य, जसे मी त्याच्याकडे पाहिले; मागे सरला. त्याच्यावर छाया होती, तेथे एकही गोष्ट नाही की, औषध मनुष्यास आजतगायत मदत करु शकेल. तो मरणाच्या अवस्थेत होता. ते बरोबर आहे. त्याची एक शस्त्रक्रिया झाली होती आणि ती शस्त्रक्रिया मुत्राशयासंबंधीची शस्त्रक्रिया होती आणि तो कर्करोग आहे, आणि तो कर्करोग तुझ्यात सर्वत्र पसरला आहे. जर ते खरे आहे, तुझा हात वर कर, फक्त देवच त्याला बरे करु शकतो. [भाऊ म्हणतो, "हालेलुयाह! हालेलुयाह! हालेलुयाह!"—संपा.] परंतु, पाहा, महाशय मी तुला काहीतरी सांगू इच्छितो. ते सैतानाने कदाचित डॉक्टरच्या सुरीपासून

लपवून ठेवले असेल, परंतु तो देवापासून लपवू शकत नाही. तू त्यावर विश्वास ठेवतोस का? ["ओह! ओह!"] तर मी प्रार्थना करितो की, येशू ख्रिस्ताच्या नावाने ती गोष्ट त्याला सोडून जावो, तो मनुष्य जिवंत राहो. काहीच नाही; फक्त अशक्त झाला आहे. ठीक आहे.

225 तुम्ही आणि मी एकमेकांस अनोळखी आहोत. एक पुरुष आणि एक स्त्री भेटतात. आता, पुरुषासारखा मी तुला ओळखत नाही आणि एका स्त्रीसारखी, तू मला ओळखत नाही. तू फक्त माझे नाव, किंवा फोटो, किंवा तसेच काही पाहिले असेल, त्यापेक्षा अधिक नाही. परंतु, आपण एकमेकांस ओळखत नाही. ते आपले चारित्र्य आहे. आपल्याला एकमेकांचे चारित्र्य ठाऊक नाही. परंतु ख्रिस्ताचे स्वभाव वैशिष्ट्य तो वचन आहे. आणि वचन ह्या दिवसासाठी दिले आहे. ते सांगताना तुम्ही मला ऐकले आहे. मग त्याचे स्वभाववैशिष्ट्ये येथे त्याची ओळख देतील. मी त्याची ओळख देणार नाही. मी तुम्हाला ओळखीत नाही. तुम्हाला समजले. आपली—आपली मंडळी हे समजत आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] मी—मी एक मनुष्य आहे. मी केवळ तुमचा भाऊ आहे.

226 जसे त्या विहीरीकडील स्त्री, काहीतीरी चुकीचे बोलली. तुझ्याबरोबर काहीतरी चुकीचे आहे, किंवा तुला काय हवे, किंवा तू येथे कशासाठी आला आहेस. परमेश्वर त्याचा न्याय करो. तू रक्ताशयाच्या अवस्थेतून जात आहेस. ते खरे आहे. आहे की नाही. [ती बहिण म्हणते, "होय."—संपा.]

227 मी—मी सतत त्यावर प्रहार केला, कोणीतरी विचार करीत आहे की, मी तो अंदाज केला. मी तो अंदाज केला नाही. नाही, प्रत्येक वेळी कधीतरी मला तसे वाटते कोणीतरी. तुम्ही तुमचे विचार आता लपवू शकत नाही. आता, तेथे अंदाजे, मला माहित आहे, दोन खरे दुष्ट संशयवादी येथे बसलेले आहेत. समजले? म्हणून आता लक्षात ठेवा. मी तुमचे नाव ही पुकारु शकतो. देव हे करु शकतो. म्हणून तुम्ही तसा विचार करणे सोडून द्या. मला तुम्हाला दाखवू द्या.

228 येथे पाहा, बाई, माझ्याकडे पाहा. मला ठाऊक नाही त्याने तुला काय सांगितले, परंतु मला—मला ठाऊक आहे तो काय आहे. आणि ते त्याचे स्वभाव वैशिष्ट्य ओळखले आहे. होय, ती रक्तशयाची, अवस्था आहे. रक्त, पाणी.

229 आता, येथे, येथे काहीतरी आहे. पाहा जर ते समजत असतील की हे अंदाज करणे आहे. तु तुझ्या मुलाला घेऊन ये. ज्याच्यासाठी तू प्रार्थना करीत आहे. जो येथे आहे. [ती बहिण म्हणाली, "हो."—संपा.] ते बरोबर आहे. तो टॉन्सिल्स. जीभे खालील ग्रंथी त्याच्या घशाखाली आहे. ["होय"] ते शस्त्रक्रियेसाठी येथे वर आलेले आहे. ते बरोबर आहे ना. ["होय."] तो रुमाल घे आणि त्याच्या त्या भागावर ठेव आणि विश्वास कर ["होय"]. संशय करु नको. त्यासाठी शस्त्रक्रियेची गरज नाही. आता तुझ्या संपूर्ण अंतःकरणाने विश्वास ठेव.

230 तू कशी आहेस? गोष्ट अशी आहे, येथे ह्या स्त्रीसाठी, की तू कशासतरी घाबरतेस. तू घाबरली आहेस. की जन्मखूण कर्करोगात बदलली आहे. [बहिण रडते, "ओह!"—संपा.] आता जा, विश्वास कर, आणि ते तसे होणार नाही. फक्त जा, तुझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास कर. स्वभाव वैशिष्ट्ये, माझे नाही, त्याचे!

231 तुम्ही आता विश्वास करता का? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] त्यामुळे प्रत्येक जणाने विश्वास केला पाहीजे. ["आमेन."]

232 आता, मी तुला ओळखत नाही. मी तुझ्यासाठी अनोळखी आहे. परमेश्वर तुला ओळखतो. तू ह्यावर विश्वास ठेवतेस काय? तुला ठाऊक आहे की मी तुला ओळखत नाही. आणि तुला ठाऊक आहे की तू मला ओळखत नाही, म्हणून तू विश्वास करतेस

की, हा आत्मा जो बोलत आहे, तो माझा आत्मा असू शकत नाही? कारण, मी एक मनुष्य म्हणून मी तुला ओळखीत नाही, परंतु अभिवचन दिलेल्या वचनाचे स्वभाव वैशिष्ट्य हे आहे की वचन दुधारी तरवारी पेक्षा तीक्ष्ण आहे. आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परिक्षक आहे.

233 तू खूप आजारी आहे, तुला स्त्रीविषयी समस्या होती, ती गर्भाशय होती आणि गर्भाशयात कर्करोग होता आणि तू गेलीस आणि काही प्रकारचे उपचार घेतले, ते किरणोत्सर्जनाचे उपचार होते आणि केवळ एक गोष्ट त्यांनी केली ती म्हणजे तो तुझ्या सर्व ठिकाणी पसरला आणि जर देवाने तुला बरे केले नाही. तर तू—तू मरशील. ते खरे आहे. आता तू विश्वास ठेवतेस की तो तुला बरे करील? [ती बहिण म्हणते, "होय."—संपा.] स्वर्गाचा परमेश्वर त्या सैतानाला धमकावो जो डॉक्टरपासून लपला आहे. ["ओह!"] तो किरणोत्सर्जनापासून कदाचित लपला आहे, परंतु पवित्र आत्म्यापासून नाही. जा, आता बहिणी त्याच्यावर विश्वास कर. बिलकुल अविश्वास करु नको, परंतु विश्वास कर. ["ओ देवा, मला बरे कर!"]

234 तू विश्वास करतोस, की देव अस्थमाच्या स्थितीतून बाहेर काढून, तुला बरे करु शकतो? [भाऊ म्हणतो, "होय"—संपा.] तू ते विश्वास करतोस? मग प्रभूच्या मार्गाने जा. आनंदाने म्हणत जा. "प्रभू मी तुझा आभारी आहे. मी विश्वास करतो की माझा अस्थमा निघून गेला आहे."

235 तू कशी आहे? तू निराश आहेस. तू फार काळापासून निराश आहे. तेथे आता, तेथे पाचक व्रण तुझ्या—तुझ्या पोटात झाला आहे. ज्यामुळे तुझ्या—तुझ्या पोटात समस्या झाली आहे आणि तू...तू, तुझे जेवण खाऊ इच्छितो? तू जे मी तुला करण्यास सांगेन ते करशील का? जा, येशू ख्रिस्ताच्या नावाने खा.

236 तू तुझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास करतेस काय? [ती बहिण म्हणते, "मी करते."—संपा.] तू एक शक्तिमान चांगली तरुण स्त्री दिसतेस, तू विश्वास करते की, मी त्याचा सेवक आहे? ["आमेन"] तू विश्वास करतेस त्याचे स्वभाव वैशिष्ट्य इथेही असू शकतील. वचन स्वतः आणि ह्या दिवसाचे अभिवचन, "जी कृत्ये मी करतो, ती तुम्हीही कराल?" ["आमेन"] मी बरे करु शकत नाही. त्याने ते पूर्वीच करुन ठेवले आहे. परंतु त्याचे स्वभाव वैशिष्ट्य त्याला प्रकट करतात. सांगू शकतात. तुझ्याबरोबर काय चुकीचे आहे. तुला स्त्रीची समस्या आहे. स्त्रीची पीडा, ["होय, महाशय"] तू विश्वास करतेस की तो परमेश्वर ती आता बरे करील? ["होय, आमेन"] तुझ्या मार्गाने जा. ते तुला आणखीन त्रास देणार नाही. तुझ्या पूर्ण हृदयाने विश्वास कर.

237 तू विश्वास करतेस की, मी त्याचा सेवक आहे? [बहिण म्हणते, "होय महाशय."—संपा.] जर देव मला तुझा त्रास काय आहे तो सांगेल, तर तू विश्वास ठेवशील की ते येशू ख्रिस्ताचे स्वभाव वैशिष्ट्य आहे? ते तुझ्या पाठीत आहे, तो आणखी नसणार. जा तुझ्या पूर्ण अंतःकरणाने विश्वास कर. विश्वास कर.

238 ये, बाई. तुलाही पोटाचा त्रास आहे. तुझ्या पूर्ण अंतःकरणाने विश्वास कर. आणि जा तुझे जेवण खा. त्याविषयी विसरुन जा. येशूख्रिस्त तुला बरे करतो.

239 ये, तुझी समस्या तुझे रक्त आहे. तुला डायबिटीस आहे. तु विश्वास करतोस की, परमेश्वर तुला बरे करील आणि तुला त्यापासून आरोग्य देईल? तुझ्या मार्गाने जा आणि म्हण, "तुझा आभारी आहे, प्रभू येशू," तुला बरे करतो, जा. तुझ्या सर्व हृदयाने विश्वास कर.

240 ये, तुझी पाठ, तु विश्वास करतो की, देव तुझ्या पाठीला आरोग्य देईल आणि तुला बरे करील? तुझ्या मार्गाने जा आणि आनंद कर आणि सांग “मी तुझे आभार मानतो, प्रभू येशू.”

241 तुलाही काही समस्या तुझ्या पाठीत आहेत. फक्त बोलत चाल, प्रभू तुझा आभारी आहे. मी बरे झालो आहे. त्यावर तुझ्या सर्व हृदयाने विश्वास कर.

242 तुलाही पाठीचा त्रास आहे. तुला त्याविषयी काय ठाऊक आहे? आता तुझ्या संपुर्ण हृदयाने विश्वास कर. आणि तुझ्या मार्गाने जा आणि बरा हो. विश्वास कर येशू ख्रिस्त तुला बरे करतो. “जर तू विश्वास करशील, सर्व गोष्टी शक्य आहेत.” ठीक आहे.

243 जर मी तुला काही सांगितले नाही तर काय; फक्त जा आणि तुझे हात तिच्यावर ठेव. तू विश्वास करतो की, ती बरी होईल? त्याने पाहिले काय झाले आहे. तू विश्वास करतो की होईल? येथे ये. मी ह्या सैतानाला येशू ख्रिस्ताच्या नावाने पुन्हा पाठवतो. देवाचे सामर्थ्य ह्या मुलाला बरे करो. आमेन. संशय करु नको. मुळीच संशय करु नको, आणि ती बरी होईल. तुझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास कर.

244 जर परमेश्वर तुला बरे करीत नाही, तु एके दिवशी संधीवातामुळे कुबड्यावर असशील, परंतु तू विश्वास कर की, परमेश्वराने संधीवात बरा केला आहे? तर जा सांग, “प्रभू तुझा धन्यवाद करतो. मी तुझ्यावर विश्वास ठेवीन. आणि तु मला बरे कर.” ठीक आहे.

245 आता ये, हे खरोखर तुझे वय आहे. तू खरंच निराश आहेस. संध्याकाळी खूप निराश होतोस, जेव्हा तू काम करतो आणि सर्व गोष्टी तू खरा निराश होतो. आता तू विश्वास करतोस? ते आता आणखी तुला त्रास देणार नाही. तुझ्या मार्गाने म्हणत जा, “प्रभू येशू तुझा धन्यवाद करतो.”

246 या, महाशय. तू विश्वास करतोस की, परमेश्वर तुझ्या हृदयाचा त्रास बरा करतो? [तो भाऊ म्हणतो, “होय.”—संपा.] तू हृदय बरे करील. फक्त बोलत जा “प्रभू, तुझा धन्यवाद करतो. मी पूर्ण हृदयाने विश्वास करतो.”

247 परमेश्वर क्षय रोगापासून आरोग्य देतो, आणि बरे सुध्दा करतो. ते तू तुझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास करतोस. का? [तो भाऊ म्हणतो, “मी ते विश्वास करतो.”—संपा.] ठीक आहे. तुझ्या मार्गावर जा. आनंदाने म्हणत जा. “प्रभू येशू, तुझा धन्यवाद करतो.”

248 तेथे जे बाहेर आहेत, तुमच्याविषयी काय तुम्ही विश्वास करता? प्रेक्षकांविषयी काय? तुम्हा प्रेक्षकांमधील कोणी आता विश्वास करता.

249 हा मनुष्य येथे बसलेला आहे. त्याच्या फुफ्फुसाच्या नळीला सुज आली आहे, तू विश्वास करतो की, देव तुझा श्वासनलिकेसंबंधी त्रास बरा करील? ठीक आहे, तर तू जे मागितले, ते तुला मिळू शकते. आमेन.

250 उच्च रक्तदाब, जो तेथे त्याच्यामागे बसलेला आहे. तू विश्वास करतो की, देव तुझा उच्च रक्तदाब बरा करील? महाशय, तो तुला सोडून गेला आहे. मी त्याला ओळखत नाही, कधीच माझ्या आयुष्यात त्याला पाहिले नाही.

251 महाशय सांगा, तू विश्वास करतो की, तुझ्या स्नायूंमध्ये आलेला आंकुचनाचा झटका, मज्जातंतू विषयी आकुंचनाचा झटका तू विश्वास करतो की, देव तो बरा करील? तू करतोस का? जर तू विश्वास करतो तर, तुझे हात वर कर. ठीक आहे.

252 तुझी पत्नी येथे बसलेली आहे. तिला सायनसचा त्रास झाला आहे. तू विश्वास ठेवतेस तो दूर झाला आहे, बहिणी?

253 ती स्त्री तेथे मागे बसलेली आहे. मज्ज्ञा तंतूला सूज व वेदना आहे. बाई तू विश्वास करते की, देव तुझी ती मज्ज्ञा तंतूची सूज व वेदना बरे करील?

254 येथे एक स्त्री लहान कोटासह, लाल कोट घालून आहे. ती तेथे बसलेली आहे. तिलाही सायनसचा त्रास आहे. ती तेथे बसलेली आहे. तिलाही सायनसचा त्रास आहे. तू विश्वास करते की, देव तुझा सायनसचा त्रास बरा करील? तुझा हात वर कर, जर तू त्यावर विश्वास ठेवते.

255 आमच्यातील कोणी विश्वास करतात की, येशू ख्रिस्ताचे स्वभाववैशिष्ट्य येथे आज रात्री आहे. तुमचे हात वर करा. म्हणा, "मी त्यावर विश्वास करतो." [मंडळी आनंदीत होते आणि म्हणते, "मी त्यावर विश्वास करते."—संपा.]

256 येथे जे सर्व उपस्थित आहे, त्याला तुमचा आरोग्यदाता म्हणून स्विकारतील, तुमच्या पायावर उभे राहा, आणि म्हणा, "मी त्यावर विश्वास करतो." उठा. तुमच्या खुर्च्यांवरून उभे राहा, जे काही असेल, येशू ख्रिस्त काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे. मी त्याला प्रभू परमेश्वराच्या नावाने तुम्हाला देतो. आमेन.

**देव स्वतःची ओळख त्याच्या स्वभाव वैशिष्ट्यांद्वारे देतो** MAR64-0320

(God Identifying Himself By His Characteristics)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, शुक्रवारी संध्याकाळी, 20 मार्च, 1964 साली, डेन्हाम स्प्रिंग्स हाय स्कूल, डेन्हाम येथे, लुइयाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे

MARATHI

©2018 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
44 28274560 • 44 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS

P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A

www.branham.org.